अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक अधिकारी प्रदीप थडसरे यांनी दिला तडकाफडकी राजीनामा



**सोलापूर :** महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख अधिकारी प्रदीप थडसरे यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे.

त्यांच्या जागी नवा अधिकारी नियुक्तीच्या हालचाली सुरू आहेत. आयुक्त पी.शिवशंकर यांच्या कार्यकाळात महापालिकेच्या आरोग्य विभागात खाते प्रमुख म्हणून प्रदीप थडसरे हे काम पाहत असताना त्यांची अतिक्रमण प्रतिबंधक अधिकारी म्हणून सप्टेंबर २०२२ मध्ये बदली करण्यात आली. आतापर्यंत साधारणतः ६ महिने त्यांनी या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचा कार्यभार सांभाळला मात्र अचानकपणे थडसरे यांनी राजीनामा दिला आहे. यामुळे महापालिका वर्तुळात याबद्दल जोरदार चर्चा सुरू आहे.दोन महिन्यानंतर मे महिन्यात ते आपल्या सेवेतून निवृत्त होणार आहेत. तत्पूर्वी शेवटच्या टप्प्यातच त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. आपल्या पदाचा राजीनामा त्यांनी प्रशासनाकडे सादर केला आहे.

त्याची प्रक्रियाही सुरू आहे. दरम्यान, महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक अधिकारिपदी लवकरच नव्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणार आहे. या संदर्भात हालचालीही सुरू आहेत.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ०३ मार्च २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १५४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# लोकमान्य झाले टिळक, कसब्याला मिळाली नवी ओळख

## ● रंगली पुणेरी पाटी, पुण्यात भाजपचा टांगा पलटी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**घरातली आमदारकी घरातच ठेवण्याचे जे धोरण भाजपने चिंचवड विधानसभा मतदारसंघात राबवले; त्याच धोरणापासून त्याच भाजपने फारकत घेत दिवंगत आमदार मुक्ता टिळकांच्या आमदारकीसाठी त्यांच्याच घरी उमेदवारी न देता दुसऱ्यांना दिली. यावरून 'कुलकर्णींचा मतदारसंघ गेला, टिळकांचा मतदारसंघ गेला, आता बापटांचा नंबर का?' अशा पुणेरी पाट्या लागल्या. त्यातून निर्माण झालेल्या सहानुभूतीमुळे टिळक घराणे पुन्हा एकदा 'लोकमान्य' झाले आणि पुण्यात भाजपचा टांगा पलटी झाला. 'सर्वमान्य' धंगेकरांनी भाजपचा बालेकिल्ला उध्वस्त करत स्वत:चा 'लोकसेवा' ब्रँड निर्माण केल्यामुळे कसबा मतदारसंघाला तब्बल तीस वर्षांनंतर पहिल्यांदाच वेगळी ओळख मिळाली.**

भाजपच्या आ. मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांचा अकाली निधनामुळे अनुक्रमे पुण्यातील कसबा आणि चिं-चवड विधानसभेची पोटनिवडणूक लागली. साहजिकच उमेदवारींसाठी टिळक आणि जगताप कुटुंबीयांचा अग्रहक्क होता. भाजपने चिंचवड मतदारसंघासाठी हा हक्क मान्य करून दिवंगत आ. लक्ष्मण जगताप यांची पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी दिली. मात्र त्याच भाजपने कसबा मतदारसंघासाठी उमेदवारी देताना टिळकांचा तोच अग्रहक्क डावलला. विशेष म्हणजे टिळकाच्या कुटुंबात भाजपने उमेदवारी दिली तर निवडणूक बिनविरोध करण्याचे धोरण महाविकास आघाडीने जाहीर केले होते. भाजपने टिळकांविषयी असलेल्या लोकभावनेची कदर न केल्यामुळे महाविकास आघाडीने कसब्याची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. त्यात पुन्हा रवींद्र धंगेकरांसारख्या सामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्यामुळे टिळकांना अस-लेली लोकमान्यता आपोआ-पच धंगेकरांकडे वळली आणि महाविकास आघाडीचा विजय सोपा झाला.



### गृहीत धरणे पडले महागात

विधानसभेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने कोथरूड मतदारसंघात विद्यमान आमदार मेधा कुलकर्णी यांना घरी बसवून कोल्हापूरच्या चंद्रकांत पाटलांना उमेदवारी दिली. त्यावेळी कोथरूडकरांनी पाटलांना निवडून दिले. त्याच धर्तीवर कसबा मतदारसंघही भाजपच्या ताब्यात असल्यामुळे भाजपने दिलेल्या उमेदवाराला मतदार निवडून देतील, असे भाजपने गृहीत धरले. हे गृहीत धरणेच मतदारांना पसंत पडले नाही. त्यातून तयार झालेली नाराजी पुणेरी पाट्यातून दिसली. तीच नाराजी शेवटपर्यंत टिकली.

### हक्काच्या मतदारांनीही दिला दणका

नारायणपेठ, सदाशिवपेठ आणि शनिवारपेठ या भागातील मतदार हा भाजपचा हक्काचा मतदार आहे. गेल्या निवडणुकीत या पेठांमधून मुक्ता टिळक यांना जवळपास २० हजारांचे मताधिक्य मिळाले होते. या मतांच्या जोरावरच कसब्यातला टिळकांचा विजय सोपा झाला होता. आता या पोटनिवडणुकीत याच पेठांमधून धंगेकर यांनी मुक्ता टिळकांचे २० हजारांचे मताधिक्य तोडून दीड हजारांचे मताधिक्य मिळवले. या याचाच अर्थ भाजपच्या हक्काच्या मतदारांनीच भाजपला दणका दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

### जे बापटांना जमले ते रासनेंना नाही जमले

कसबा मतदारसंघातून गिरिष बापट पाचवेळा आमदार झाले. या मतदारसंघातील सर्व पक्षीय नेते आणि कार्यकर्त्यांशी बापटांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्याचा उपयोग बापटांना निवडणुकीत व्हायचा. इतर पक्षातील मित्रही त्यांना हस्ते परहस्ते मदत करायचे. त्यामुळे बापटांचा विजय सोपा व्हायचा. हे कसब बापटांना जमले होते. मात्र हेच कसब रासने यांना जमले नाही. त्यांना भाजपमधील मित्रांचीही पूर्ण मदत मिळवता आली नाही. त्यातच आजारी बापटांना प्रचारात उतरवणेही अनेक भाजपवाल्यांना आवडले नाही.

### महाविकास आघाडीची एकी अन् धंगेकरांचा संपर्क

धंगेकर हे शिवसेना, मनसेमार्गे काँग्रेसमध्ये आले आहेत. यापूर्वी त्यांनी दोनवेळा याच मतदारसंघातून विधानसभा लढवली आहे. त्यामुळे त्यांचा या मतदारसंघात सर्वदूर संपर्क तर आहेच. शिवाय महाविकास आघाडी याठिकाणी प्रचंड एकीने लढली. कट्टर शिवसैनिकांनी तर धंगेकरांना उघड मदत केलीच. त्याशिवाय मनसेच्या कार्यकर्त्यांनीही धंगेकरांशी असलेली जुनी मैत्री जपली. टिळकांना उमेदवारी न मिळाल्यामुळे तयार झालेल्या नाराजीचाही धंगेकरांना फायदा झाला.



■ दहावी परीक्षेला गुरूवारपासून सुरूवात झाली. पालकांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना बेस्ट ऑफ लक दिला.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**सोलापूर :** भोगाव (ता. उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या एका ३३ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. सागर उमाकांत सरतापे (वय ३३ रा.भोगाव) असे मयताचे नाव आहे.

दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या लोखंडी हुकाला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही.

## भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणाच्या मृत्यूप्रकरणी दोघांना अटक



**सोलापूर :** आईचे दुसऱ्या महिलेसोबत सुरू असलेले भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या तरुणाला महिलेने ढकलून दिल्याने लोखंडी खांबावर आदळल्याने बेशुद्ध झाला.त्यानंतर त्याचा मृत्यू झाला.आदर्श राजू दास (वय २४, रा.जगजीवन राम झोपडपट्टी,मोदी) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी मृताची बहीण शीतल नागनाथ चिंतामणी (रा.न्यू जगजीवनराम झोपडपट्टी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाच जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी दोन महिलांना पोलिसांनी अटक केली आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या मलंग शहावली दर्गा येथे मृत तरुण आपल्या आईसोबत अनेक महिन्यांपासून राहत होता. मंगळवारी किरकोळ कारणावरून मृत आदर्शच्या आईचे व तेथीलच रेश्मा खाजा कोथिंबिरे हिच्याशी वाद सुरू झाला. त्यावेळी आरोपी बिल्किस आमजद कुरेशी, निलोफर सरफराज प्यालामदी, सुरेश राम तुपसुंदर, गौस आमजद कुरेशी यांनी मिळून आदर्श व त्याच्या आईला शिवीगाळ करत होते. यावेळी हा वाद सोडविण्यासाठी आदर्श हा मध्यस्थी करत होता. त्याचदरम्यान त्याला बिल्किस हिने जोरात ढकलून दिले. त्यावेळी तो लोखंडी खांबावर आदळून बेशुद्ध झाला. त्याला खासगी हॉस्पिटलमध्ये नेले असता त्याचा मृत्यू झाला, अशा आशयाची फिर्याद चिंतामणी यांनी दिली आहे.

दरम्यान, घटनेची माहिती नातेवाइकांनी पोलिसांना दिली. माहिती कळताच, सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस हे घटनास्थळी दाखल झाले.बुधवारी रात्री या प्रकरणी वरील पाच जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलीस निरीक्षक धायतोंडे करत आहेत. याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

## मोहोळ येथे अपघात; जखमी दुचाकीचालकाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

रोपळे ते मोहोळ मार्गावरील हिरवे पाटीजवळ मोटारीच्या धडकेने जखमी झालेले बाळू श्रीमंत खांडेकर (वय ३८ रा. गोटेवाडी ता.मोहोळ) हे सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी दुपारी मयत झाले.

ते २२ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास रोपळे येथून मोहोळच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी मोटारीच्या धडकेत गंभीर जखमी झाले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून गंभीर अवस्थेत मंगळवारी सोलापुरात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कॉपी मुक्त परीक्षा होऊ दे!

कल्याण

259-60-334

मेन बाजार

--------

## सांगोला सूतगिरणीला देणार कै.भाई गणपतराव देशमुख यांचे नाव

सुराज्य/सांगोला

सांगोला येथील शेतकरी सहकारी सूतगिरणीला या सूतगिरणीचे संस्थापक तथा शेकापचे नेते कै. भाई गणपतराव देशमुख यांचे नाव देण्यात आले आहे. याबाबत सूतगिरणीने नामांतराबाबत केलेला ठराव पी. शिवा शंकर आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य तथा अतिरिक्त निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मंजूर केला आहे.

या नामांतरानुसार सांगोला सूतगिरणी ही शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या. सांगोले ता. सांगोले, जि. सोलापूर या नावाऐवजी डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या, सांगोले ता. सांगोले, जि. सोलापूर या नावाने ओळखली जाणार आहे.



सूतगिरणीने केली उपविधी दुरुस्ती : शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या. सांगोले ता. सांगोले जि. सोलापूर या सूतगिरणीच्या दिनांक २२/०९/२०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या सूतगिरणीस भाई गणपतराव देशमुख यांचे नाव देण्यात यावे असा ठराव मंजूर करण्यात आला होता. शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या. सांगोले ता. सांगोले, जि. सोलापूर या नावाऐवजी डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या सांगोले, (ता. सांगोले) असे नामांतर करण्याचा निर्णय बहुमताने घेण्यात आला होता. हा ठराव मंजुरीसाठी पी. शिवा शंकर आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य तथा अतिरिक्त निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

त्यानुसार शिवशंकर आयुक्त, वस्त्रोद्योग, राज्य यांनी या नामांतर ठरवाला नुकतीच मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदी अन्वये उपविधी दुरुस्ती क्रमांक १.१ मंजूर करण्यात आले असल्याचे पत्र वस्त्रोद्योग आयुक्तालयाने जारी केले आहे.

## केगावजवळ अपघात; दुचाकीचालक ठार

**सोलापूर :** पुणे महामार्गावरील केगाव महिंद्रा शोरूम जवळ एक दुचाकी चालक गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मदन किसन जगताप (वय ४० रा. वैराग ता. बार्शी) असे मयताचे नाव आहे. दुपारी ३ वाजेच्या सुमारास केगाव येथील महिंद्रा शोरूम जवळ गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. शिवाय त्याच्या बाजूला दुचाकी आढळली. त्याला शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयस झाला या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

## शरद पवारांवरुन विधानसभेत गदारोळ | शेलारांची दिलगिरी; सातपुतेंची माफी

**मुंबई :** भाजपा आमदार राम सातपुते यांनी शरद पवारांचा अवमानजनक उल्लेख केल्याने सभागृहात प्रचंड गोंधळ झाला. याप्रकरणी महाविकास आघाडीने राम सातपुते यांची माफी मागण्याची मागणी केली. राष्ट्रवादीचे आमदार आक्रमक झाल्याने सभागृहाचे कामकाज रखडले गेले. अखेर भाजपा आमदार आशिष शेलार यांनी पुढाकार घेऊन राम सातपुतेंच्या वतीने माफी मागितली आणि प्रकरण निवळले.

राज्यपालांच्या अभिभाषणावर राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड चर्चा करत होते. त्यावेळी त्यांनी आमदार राम सातपुते यांच्याबाबत विधान केले. यामुळे संतापलेल्या राम सातपुते यांनी जितेंद्र आव्हाडांना निशाण्यावर घेतले. त्यावेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याबाबत अवमानजनक वक्तव्य केले. त्यामुळे सभागृहात एकच गोंधळ झाला. महाविकास आघाडीने आक्रमक भूमिका घेतली. गोंधळ वाढल्याने तालिका अध्यक्ष योगेश सागर यांना काहीकाळ सभागृह तहकूब करावं लागले.



सभागृहातील चर्चा तपासली जाईल, रेकॉर्डवर काही चुकीचं आले तर ते काढले जाईल, असे आश्वासन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले. मात्र, तरीही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधानसभेत घोषणाबाजी सुरूच ठेवली. शरद पवारांची माफी मागितल्याशिवाय सभागृह सुरू न करण्याची भूमिकाच महाविकास आघाडीने घेतली. दरम्यान, सभागृहात उपस्थित नसलेले विरोधी पक्षनेते अजित पवार सभागृहात आले. यावेळी अजित पवार यांनीही शरद पवारांच्या अवमानजनक वक्तव्याविरोधात भूमिका घेतली. राम सातपुते यांनी माफी मागून विषय संपवावा अशी मागणी केली. एखाद्या नेत्याविषयी कोणीही अवमानजनक वक्तव्य करेल आणि मग तुम्ही पटलावरून ते काढून टाकणार हे योग्य नाही. असा नवा पायंडा पाडू नका अशी विनंती अजित पवारांनी केली. अजित पवारांच्या आक्रमक भूमिकेनंतर भाजपा आमदार आशिष शेलार यांनी माफी मागितली. आशिष शेलारांनी माफी मागितल्यानंतर राम सातपुते यांनीही दिलगिरी व्यक्त केली.

## भारत सर्वबाद, ऑस्ट्रेलियाला विजयासाठी ७६ धावांची गरज

सुराज्य/इंदौर

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरु तिसऱ्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवशींदेखील गोलंदाजांचं वर्चस्व दिसून आलं. आधी इंग्लंडचे ६ गडी बाद झाल्यावर भारताचा संपूर्ण संघही १६३ धावांत गारद झाला आहे. ज्यामुळे आता ऑस्ट्रेलियाला विजयासाठी केवळ ७६ धावा करायच्या आहेत.

सामन्यात पहिल्या दिवशी भारतीय संघाला अवघ्या १०९ धावांत कांगारुंनी सर्वबाद केलं. ज्यानंतर पहिल्या दिवशी एकूण ४ आणि दुसऱ्या दिवशीचा खेळ सुरु झाल्यावर उर्वरीत ६ विकेट्स घेत भारतानं १९७ धावांत ऑस्ट्रेलियाला रोखलं. ज्यानंतर ८८ धावांची पिछाडी घेऊन मैदानात उतरलेला भारत १६३ धावाच करु शकला. पुजाराच्या ५९ धावांमुळे भारताने किमान इतकी धावसंख्या केली. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाकडून लायनने तब्बल ८ तर स्टार्क आणि कुहनेमनने प्रत्येकी एक विकेट घेतली.

# परिवर्तनाची नांदी...

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या पुण्यातील कसबा विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी भाजपच्या गडाला सुरुंग लावत ऐतिहासिक विजय मिळवला तर शेजारच्या चिंचवड मतदार संघात भाजपच्या अश्‍विनी जगताप यांनी विजय मिळवून पक्षाची प्रतिष्ठा राखली व राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यांची डाळ तिथे शिजू दिली नाही. आता पराभवाची कारणे समोर यायला लागतील. जो-तो पक्ष आपापल्या परीने चिकित्सा करायला लागेल पण खोलात जाऊन निष्कर्ष काढावे लागतील. कसबा हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. पूर्वीच्या भाजप-शिवसेना युतीतून भाजपचा उमेदवार येथून निवडून यायचा. मात्र, पोटनिवडणुकीत राजकीय समीकरणे बदलली. महाविकास आघाडीने एकी दाखवून भाजपच्या विरोधात एकच उमेदवार दिला. कसब्यात मतांची विभागणी झाली नाही. त्यामुळे महाविकास आघाडीला यश मिळाले, असे ठासून म्हणावे लागेल. कसबा मतदार संघात ब्राह्मण समाजाची निर्णायक मते आहेत. त्यामुळे स्व. मुक्ता टिळक यांच्याच परिवारातील एकाला उमेदवारी द्यावी, अशी मागणी पहिल्यापासूनच होत होती परंतु भाजपने बहुजन कार्ड बाहेर काढत हेमंत रासने यांना तिकिट दिले. आता भाजपचा पराभव झाल्याने जर तरच्या चर्चा झडायला लागतील पण अशा चर्चांना काहीच अर्थ नसतो. धंगेकरांच्या विरोधात प्रचार करण्यासाठी भाजपला ४० स्टार प्रचारकांची फौज पाठवावी लागली. शिवाय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मैदानात यावे लागले. भाजप व शिंदे गट सत्तेत असताना पराभव व्हावा ही बाब दोघांसाठीही मोठी नामुष्कीची आहे. प्रदीर्घ काळापासून भाजपचा बालेकिल्ला असलेल्या कसबा मतदारसंघात धंगेकर यांच्याकडे तगडे उमेदवार म्हणून पाहिले जात होते. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत कसब्यातून निवडून आलेले भाजपचे तत्कालीन उमेदवार गिरीश बापट यांच्याविरोधात त्यांचा अल्पशा फरकाने पराभव झाला होता. धंगेकर तेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत होते. ते पाच वेळा नगरसेवक असून त्यांनी पुणे महानगरपालिकेत शिवसेना आणि मनसेचे दोन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. २०१७ मध्ये त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि काँग्रेस समर्थीत अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले. धंगेकर हे कसब्यात मागील २५ वर्षांपासून नगरसेवक आहेत. त्यामुळे जनतेचा कायम त्यांना पाठिंबा राहिला आहे. त्यासोबतच ते सामान्यांचे नेते आहेत. रात्री-बेरात्री नागरिकांच्या कामाला धावून जातात, अशी त्यांची ख्याती आहे. त्यामुळे सामन्यांपासून उच्चभ्रू लोकांपर्यंत ते सगळ्यांचे लाडके नेते आहे. सामान्यांसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी जनता असते हा बोध या निकालातून सर्वच राजकिय पक्षांच्या हायकमांडनी घ्यायला हवा.कसबा पेठेतील भाजपचे वर्चस्व असलेल्या सदाशिव पेठ, नारायण पेठ आणि शनिवार पेठेत जनतेने भाजपला डावलल्याचे दिसत आहे. त्यामुळे या भागातही धंगेकरांनाच जास्त मते मिळाली. रासने यांनी या सगळ्या परिसरात कायम काम केल्याचे सांगितले जाते. तिथल्या मतदारांचा त्यांना पाठिंबा असतो. मात्र, त्याच भागात जनतेने भाजपला पाठिंबा न दिल्याचे दिसत आहे. त्याबद्दल फडणवीस आणि बावनकुळे यांना आत्मचिंतन करावे लागेल. हिंदू महासंघाचे आनंद दवे यांना निकालानंतर उपरती झाली. कसबा, सदाशिव, नारायण येथील सर्व मतदारांनी या वेळेस भाजपाच्या विरोधात मतदान केले. गेल्या वेळेस या प्रभागात मुक्ता टिळक यांना वीस हजारांचे मताधिक्य मिळाले होते. या वेळेस भाजप येथून १ हजार ४०० मतांनी मागे पडला. बेगडी हिंदुत्वाच्या विरोधात, आर्थिक आरक्षण नाकारणे आणि प्रामाणिक, पारंपरिक मतदारांना गृहीत धरणे याचा राग आमच्यामुळे व्यक्त झाला, असे दवे म्हणतात. आता दवे यांनी देखील 'राग भीक माग' हा मार्ग पत्करला पाहिजे. चिंचवडमध्ये भाजपच्या अश्‍विनी जगताप विजयी झाल्या. भाजपची प्रतिष्ठा तिथे जपली गेली अन्यथा ही हातची जागा गेली असती तर भाजपचे नाकच कापले गेले असते. तिथे राष्ट्रवादीच्या नेत्यांनी जोर लावला होता. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीचे नाना काटे यांना उभे केले होते. तिथे शिवसेनेचे कलाटे यांनी बंडखोरी केली. त्यामुळे मतविभागणीचा फटका राष्ट्रवादीला बसला, असे म्हणावे लागेल. आता या बंडखोरीवरून राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्यात संघर्ष होईल, असे दिसते. कारण कसब्याप्रमाणे एकजिनसीपणा चिंचवडमध्ये दिसला नाही. ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत म्हणतात की- ही २०24 च्या परिवर्तनाची नांदी आहे. चला एक वेळ तसे मानू या. आघाडीतील नेते केवळ कसब्यावर प्रतिक्रिया देतायेत. चिंचवडविषयी ते 'ब्र' काढत नाहीत.असो.राऊत म्हणतात, त्याप्रमाणे आघाडी टिकली तर लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप दमछाक होणार आहे. आता भाजपला आपल्या रणनीती बदल करावा लागेल. निष्ठावंतांना न्याय द्यावा लागेल.

## जागतिक वन्यजीव दिन

# निसर्ग रक्षकाच्या भूमिकेत वन्यजीव

> जगभरातील जैवविविधता आणि वन्यजिवांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी दरवर्षी ३ मार्च रोजी जागतिक वन्यजीव दिन साजरा केला जातो. यावर्षीची थीम वन्यजीव संरक्षणासाठी भागीदारी आहे. मोठ्या प्राण्यांपासून कीटकांपर्यंत, पृथ्वीवरील जीवनाची विशाल विविधता मानवी जीवनात आणि कल्याणासाठी खूपच योगदान देते. ५०,००० वन्य प्रजाती जगभरातील अब्जावधी लोकांच्या गरजा पूर्ण करतात. जगातील ५ पैकी १ व्यक्ती उत्पन्न आणि अन्नासाठी वन्य प्रजातींवर अवलंबून आहेत, तर २.४ अब्ज लोक अजूनही स्वयंपाकासाठी लाकडाच्या इंधनावर अवलंबून आहेत. अनेक फायदेशीर वनौषधींची झाडे, वनस्पतीही लुप्तप्राय प्रजातींच्या गटात आली आहेत. गेल्या ४० वर्षांत, वन्य प्रजातींच्या संख्येमध्ये सरासरी ६० टक्के घट झाली आहे. सध्या दहा लाखांहून अधिक प्रजाती धोक्यात आहेत. आज अस्तित्वात असलेले वन्यजीव, प्रजाती आणि जलचर यांच्याविषयी जागरूकता वाढवणे प्रत्येकासाठी महत्त्वाचे आहे. पृथ्वीवरील मानवी जीवन टिकून राहण्यासाठी वन्यजिवांचे संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे.

**माणसाची लोभीवृत्ती शिगेला पोहोचली :-** आपल्या सर्वांना माहीत आहे की, माणसापेक्षा लबाड, लोभी, स्वार्थी असा दुसरा प्राणी जगात नाही. आज प्रत्येक माणूस स्वतःच्या फायद्यासाठी संघर्षात गुंतलेला दिसतो, जरी त्याच्या स्वार्थामुळे अनेक निष्पाप लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले तरी चालेल. गावे उद्ध्वस्त होऊन शहरांकडे वेगाने स्थलांतर होत आहे, शहरे महानगरांचे भव्य रूप धारण करत आहेत. शहरांच्या आजूबाजूच्या खेड्यातील सुपीक शेतीत पिकांच्या जागी आता मोठमोठ्या आलिशान इमारती बांधल्या जात आहेत. प्रदूषण, भेसळ, जंगलतोड, यांत्रिक साधनांचा अतिवापर, नैसर्गिक साधनसंपत्तीचे अतिशोषण यामुळे पर्यावरणाचे चक्र बिघडत आहे. आज माणसाला घरा-अंगणात मोकळी जागा किंवा झाडे नकोत, तर अधिकाधिक काँक्रिटच्या खोल्या हव्या आहेत, त्यासाठी इतरांच्या जागेवर अतिक्रमण करावे लागले तरी त्यांना चालेल. आजचा स्वार्थी माणूस त्याच्या चुकीची शिक्षा संपूर्ण पर्यावरण आणि सजीव वर्गाला देत आहे. निसर्गाशी छेडछाड केल्याने ग्लोबल वॉर्मिंग, ओझोन थराची समस्या, वाढते तापमान, अन्नसुरक्षेचा अभाव, पूर आणि दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, वाढते गंभीर आजार हे अशा लोकांच्या चुकीचे परिणाम आहेत. उदाहरणार्थ, जगात इतके लोक नाहीत, त्यांच्यासाठी जेवढे मोबाईल बनवले आहेत, पण गरजेनंतर हे करोडो मोबाईल पर्यावरणाला कोणतीही हानी न पोहोचवता शंभर टक्के योग्य रित्या व्यवस्थित (रीसायकल) केले जातात?

**वन्यजिवांवर आधारित मानवी जीवन :-** या आधुनिक युगाकडे पाहिल्यास असे दिसते की मानव हा जीवन देणारा निसर्गाचा भक्षक आणि वन्यजीव अनादी काळापासून निसर्गाच्या रक्षकाच्या भूमिकेत सक्रियपणे गुंतलेले आहेत. प्रत्येक मानवाला माहीत आहे की जगण्यासाठी सर्वात आवश्यक शुद्ध हवा, पाणी आणि अन्न ही निसर्गाची देणगी आहे, त्याशिवाय मानवी अस्तित्व असू शकत नाही. तरीही जीवन देणाऱ्या ह्या सुंदर निसर्गाला वाचवण्याऐवजी लोक स्वार्थापोटी त्याची हानी करण्यात गुंतले आहेत. वन्यजीव हवामान बदलाचे संरक्षण करून पोषक समृद्ध अन्न स्रोत राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, त्यामुळे जैवविविधता पारिस्थितिक तंत्र अधिक चांगले कार्य करते. मातीची गुणवत्ता आणि सुपीकता सुधारते. वन औषध, व्यवसायासाठी कच्चा माल, शुद्ध हवा, पाणी उपलब्ध आहे. पर्यावरण सुधारण्यात सर्व वन्यजीव मोलाची भूमिका बजावतात. कोरोनाच्या टाळेबंदीच्या काळात, जेव्हा जगातील मानवनिर्मित संसाधने थांबून त्यात मानवी हस्तक्षेप पूर्णपणे बंद होता, तेव्हा हा जीवन देणारा निसर्ग वन्यजिवांच्या साहाय्याने स्वतःमध्ये झपाट्याने सुधारणा करत होता, म्हणजेच मानवी जीवनासाठी आवश्यक असलेले नवीन आयाम तयार करत होता. सुंदर निसर्गाचे ते अलौकिक दृश्य त्यावेळी पाहायला मिळाले जे आपल्या जीवनासाठी सर्वात मौल्यवान आहे.

आजकाल वन्यप्राण्यांचे अपघात, वन्यप्राणी आणि मानव संघर्ष, सततच्या मृत्यूच्या बातम्या मिळतात. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या म्हणण्यानुसार, या २०२३ वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत देशात वाघांच्या मृत्यूची संख्या सर्वाधिक ३० वर पोहोचली आहे, जी अत्यंत चिंताजनक आहे, देशाच्या राष्ट्रीय प्राण्याचे हे वास्तव आहे. दरवर्षी जंगलाचे घनदाट क्षेत्र कमी होत असून मानवी वस्ती झपाट्याने वाढत आहे. अनेक वेळा उन्हाळ्यात सर्व सुविधांनी परिपूर्ण असलेला बुद्धिमान प्राणी माणूस देखील पाणी आणि हिरवाईसाठी भटकताना दिसतो.



लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे, प्रशासन, मंत्रालय, न्यायालय अशी व्यवस्था मानवाच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी आहे, तरीही अनेक परिस्थितीत माणूस हतबल दिसतो. वन्यजिवांच्या गरजा मानवाच्या गरजा इतक्या अमर्याद नाहीत. वन्य क्षेत्रात वाढता मानवी हस्तक्षेप ही वन्यप्राण्यांची सर्वात मोठी समस्या आहे. आज लोकांना निसर्गाच्या कुशीत, जंगलात आयुष्याचे सुखाचे क्षण घालवण्यासाठी फार्महाऊसची गरज आहे, पण त्या जीवनदायी निसर्गाच्या संवर्धनाची जबाबदारी नको आहे. वन्यप्राण्यांच्या भूक-तहानाचा प्रश्न सुटला आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाला हानी पोहोचली नाही, तर तेही त्यांच्या अधिवास क्षेत्रात नैसर्गिकरीत्या जगू शकतील. माणसाने निसर्गाकडून जेवढे आवश्यक आहे तेवढेच घ्यावे आणि कालांतराने ते निसर्गाकडे परत करत चालले पाहिजे, जेणेकरून येणाऱ्या पिढ्यांनाही पृथ्वीवर मुक्तपणे जगता येईल. निसर्गासमोर आपण सगळे शून्य आहोत, वन्यजिवांचा अंत म्हणजे मानवी जीवनाचा अंत. निसर्ग हा जीवनाचा स्रोत आहे आणि निसर्गाच्या संरक्षणासाठी वन्यजीव आवश्यक आहे, त्यामुळे माणसाला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी वन्यजीव वाचवावे लागेल.

**- डॉ. प्रितम गेडाम.**
(०८२३७४१७०४१)

## टुडेज् ब्लॉग

# उच्छाद कसा निस्तरायचा?

कुणी अमृतपाल सिंग हा लढाऊ 'धर्मप्रसारक' म्हणून जर्नैलसिंग भिंद्रनवाले बनू पाहातो आहे! हे कुणाहीसाठी सोपे नाहीच. भिंद्रनवाले हे चुकीची राजकिय समीकरणे बहकल्याचे कटू फळ होते. तर आजच्या पंजाबी युवकांची अस्वस्थता आपल्याला उपयोगी पडेल, असे अमृतपाल मानतो आहे. युवकांमधील या अस्वस्थतेला हमीभाव, महागाई, बेरोजगारी अशा स्थानिक स्थितीपासून ते रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक अर्थकारणावर झालेल्या परिणामापर्यंत अनेक कारणे आहेत.अलिकडल्या बातम्या अशा की, या अमृतपालचा एक सहकारी लव्हप्रीत सिंग तुफान याला पंजाबच्याच रूपनगर (रोपडम्) येथील चमकौरसाहिब गुरुद्वाराचे वारिंदर सिंग यांचे अपहरण आणि छळ केल्याबद्दल पोलिसांनी अटक केली. अजनाला पोलीस ठाण्यात याविषयी दाखल झालेल्या तक्रारीत अमृतपालचेही नाव होते. तुफान याच्या सुटकेसाठी अमृतपालने अजनाला पोलीस ठाण्यावर मोर्चाचा इशारा दिला, तेव्हा हिंसाचाराची शक्यता लक्षात घेऊन अजनाल्यात आसपासच्या ठाण्यांतून ६०० पोलिसांची कुमक सज्ज होती (या ६०० आकड्याबद्दल शंका घेण्यास वाव आहे). पोलीस ठाण्याबाहेर अडथळे - बॅरिकेड लावले होते. तरीही, अमृतपाल व त्याच्या 'वारिस पंजाब दे' संघटनेचे लाठ्याकाठ्याच नव्हे तर बंदुकाही घेऊन मोर्चास आलेले अनुयायी अडथळे तोडून पोलीस ठाण्यात घुसले, सरकारी मालमत्तेचे त्यांनी यथेच्छ नुकसान केले. वास्तविक प्रशिक्षित आणि काटेकोर सूचना दिलेले असे शंभरेक पोलीस शिपाई या आक्रस्ताळी मोर्चेकऱ्यांना आटोक्यात आणू शकले असते. मात्र, जमावाने हल्ला केल्यास काय करायचे, जमाव कसा पांगवायचा याच्या सूचना देणे आवश्यक असते. इथे शिपायांना जमाव हिंसक झाल्यास काय करायचे याच्या सूचना नसल्याने पारडे फिरले. काय करायचे आहे, हे केवळ संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनाच नव्हे तर राज्यस्तरीय पोलीस उच्चपदस्थांनाही माहीत नसावे हे 'अपयश'च आहे, असे मी म्हणेन.मात्र व्यक्तिश: मला, अशा कसोटीच्या क्षणी पोलिसांच्या कारवाईवर जे लोक घरच्या घरी बसल्याबसल्या टीका करतात, त्यांनाही काही सुनवावेसे वाटते. प्रत्यक्ष जमिनीवर त्या-त्या क्षणी जे काही घडत असते, ते हाताळणे कठीणच असते आणि नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांना तातडीनेच निर्णय घ्यावे लागतात. असे अधिकारी आत्मविश्वासाने, काहीएक सारासार विचाराने निर्णय घेत असतील तर त्याचे परिणामही लोकांनी मान्यच केले पाहिजेत. निर्णयाच्या परिणामापेक्षा त्यामागला हेतू पाहिला पाहिजे. वारिंदर सिंग यांच्या अपहरणामागे लव्हप्रीत नव्हताच, असे अमृतसरचे पोलीस आयुक्त आणि अजनालाच्या वरिष्ठ पोलीस अधीक्षकांना पटवून देण्यात अमृतपाल यशस्वी झाल्याचे दिसते. कारण या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एका धर्मप्रसारकाच्या मागणीनुसार, लव्हप्रीतला सोडून दिले! ही शरणागती पोलिसांना आणि पोलीस नेतृत्वालाही यापुढल्या काळात भोवणारी ठरेल, हे निश्चित. वारिंदरने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत प्रथमपासून लव्हप्रीतचे नाव होते. मग पोलिसांनी तपास करणे गरजेचे होते. अपहरण खरोखरच झाले का? वारिंदर म्हणतात तसा शारीरिक हल्ला त्यांच्यावर झाला का? असल्यास, जखमांचे स्वरूप काय होते? अमृतपालच्या भाषणांवर वारिंदरने आक्षेप घेतला होता, हे जर खरे असेल तर वारिंदरला त्रास देण्याचा हेतू विद्यमान होता, असे म्हणावे लागते.



राजकीय पडसाद उमटू शकणाऱ्या या घटनाक्रमाबद्दलची माहिती अजनाला पोलिसांनी त्यांच्या वरिष्ठांना सातत्याने कळवत राहणे गरजेचे होते. मग तेथील पाचही पोलीस ठाण्यांचा कार्यभार असलेल्या अधिकाऱ्यांनी, शेजारच्या पोलीस ठाण्यांतून जादा कुमक मागवणेही आवश्यक होते. राज्य पोलीस महासंचालकांना कळवून पोलिसांचीच सशस्त्र तुकडीसुद्धा मागवता आली असती. नोंदलेल्या तक्रारीत ज्याचे नाव आहे, त्या इसमाला प्रत्यक्ष ताब्यात घेतल्याची माहितीच आम्हांला नव्हती, या वरिष्ठांनी केलेल्या दाव्यात काहीच हशील नाही.

ही शरणागती पोलिसांना वरिष्ठ पातळीपर्यंत भोवणार' कारण बेकायदा मागण्या मान्य होण्यामागे राजकिय शक्तींचा हात असू शकतो असे वाटते. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना झाल्या प्रकाराची माहितीच देण्यात आली नसणे अशक्य. 'आप'चे भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत अननुभवी आहे, हे मर्मस्थान ठरू शकते, याची तरी जाणीव त्यांना असणे अपेक्षित आहे. दुसरी याहून कटू शक्यता म्हणजे या सीमावर्ती राज्यात पुन्हा दहशतवादाचा प्रादुर्भाव होत असणे. 'आपले सख्खे' शेजारी आर्थिक बजबजपुरीने पार गांजले असले, तरी भारताच्या दु:खात स्वत:चे सुख शोधण्याची त्यांची जुनी खोड जाईल काय? त्यामुळे ही शक्यताही विचारार्ह. १९८०च्या दशकात तर खलिस्तानी दहशतवाद्यांना त्यांनी आश्रय आणि प्रशिक्षणही दिले. सीमेपलीकडून त्या वेळी शस्त्रेदेखील पोहोचत. अमृतपाल आजतागायत त्यांच्या संपर्कात नसला, तरी उद्याही नसेलच कशावरून?

## जन्म हा अखेरचा

आकाश सर्वत्र आहे, पूर्ण आहे. परमात्मा तर आकाशाचा आकाश आहे. साऱ्या ब्रह्मांडाला अवकाश देणाऱ्या आकाशाला परमात्मा अवकाश देतो. म्हणून परमात्मा परिपूर्ण मानला जातो. तो सर्व काळात, सर्व वस्तूंत आणि सर्वत्र व्याप्त आहे. म्हणून त्याचे ज्ञानदेखील परिपूर्ण आहे. अशा परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करणे हे जीवात्म्याचे लक्ष्य होय. त्याच्या स्वरुपाविषयी पुढे सांगतात,

निर्विकल्पे परे धाम्नि निष्कले शिवनामानि ।
ज्ञानेन योजयेत् सर्व ज्ञानाचारी प्रकीर्तित: ।।
(१६.८०)

सर्व परमात्मास्वरुप आहे असे मानले तरी आपल्याला प्रत्येक वस्तू भिन्न दिसत असते. मग यासाठी काय करावे? त्यासाठी परमात्मदृष्टी मिळवावी लागेल. परमात्मा निर्विकल्प आणि निष्कल आहे.

## ज्ञानाचारस्थल



वस्तूचे नाम-रुप वगळून तिच्यातील अस्ति-भाति-प्रिय यांचा अनुभव घ्यावा लागतो. यालाच सत्-चित्-आनंद असेही म्हणतात. प्रत्येक वस्तूच्या बाबतीत 'ही वस्तू अस्तित्त्वात आहे', 'ती दिसते आणि ती मला हवी' अशी मनुष्याची भावना असते. परमात्म्याच्या अस्तित्त्वामुळेच प्रपंचातील वस्तूला अस्तित्त्व असते. त्याच्यामुळेच ती प्रकाशित होते आणि त्याच्या ठायी असलेला आनंदच वस्तूंत प्रतीत होत असतो.

**यद्भासा भासते विश्वं यत्सुखेनानुमोदते ।।१.४।।** परमात्म्याच्या प्रकाशानेच विश्व प्रकाशित होत आहे आणि त्याच्या ठायी असलेल्या सुखामुळेच जग सुखी होत आहे.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### सौर ऊर्जेचा वापर अनेक क्षेत्रात वाढविणे काळाची गरज

सधया अनेक ठिकाणी डिझेल व पेट्रोलवरील वाहने दिसतात. हळूहळू त्याची जागा आता इलेक्ट्रिक वाहनांनी घेणे सुरु केले आहे. अर्थातच पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांमुळे पर्यावरणाची हानी होते. इलेक्ट्रिक वाहनांमुळे सुद्धा चार्जिंग व पर्यावरणावरील ताण निर्माण होत आहे. मुख्यत्वे वीज निर्मित्तीसाठी आजही कोळशाचा प्रचंड प्रमाणात वापर केला जात आहे. त्यामुळे वीज निर्मितीसाठी कोळसा वापरणे ही सुद्धा पर्यावरणाला एक प्रकारे हानीच आहे. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांवर चालणारे वाहन बनविले तर मात्र पर्यावरण व इंधन बचत हे दोनही उद्देश साध्य होऊ शकतात. सूर्याचा प्रकाश हा आपणास सतत मिळत राहतो. त्यामुळे त्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेचा वापर जास्तीत जास्त केल्यास मोठी आर्थिक बचत होऊ शकते तसेच पर्यावरणाची सुद्धा हानी होत नाही.



एका आकडेवारीनुसार सूर्याच्या ऊर्जेपासून भारताच्या भूमीवर प्रत्येक चौरस मीटरवर एका तासात पाच ते सात किलोवॅट इतकी वीज उपलबध होत राहणार आहे. एक हिशोब मांडल्यास असे दिसते की, वर्षभरात ६०००० अब्ज मेगावॅट अवर इतकी वीज उपलब्ध होईल. यामुळे शून्य प्रदूषण होणार आहे. ही ऊर्जा विनामूल्य उपलब्ध होणार आहे. वाहनांचा आवाज कमी होणार आहे. यामुळे निसर्गात निर्माण होणाऱ्या सौर ऊर्जेचा वापर जास्तीत जास्त करणे हितावह ठरेल.

**- शांताराम वाघ, पुणे.**

### यातून काय साध्य होणार?

युवापिढी देशाचा आधारस्तंभ आहे. पण वाढती व्यसने त्यातही मोबाईलवर दिवसाचे अनेक तास घालवणे यातून काय साध्य होणार आहे? मोबाईलचा, इंटरनेटचा योग्य प्रकारे व विविध विषयातील ज्ञान मिळवण्यासाठी वापर व्हावा. फालतू विषय, निरर्थक वादविवाद यासाठी सोशल मीडियाचा वापर करणे यातून काय साध्य होणार?

**- उमा हाडके, पुणे.**

# बाजारात तुरी...

**एका मोठ्या समाजघटकाच्या भवितव्याशी संबंधित निर्णयाबाबत किमान यापुढे तरी टोलवाटोलवी होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. अर्थात, ओबीसी संघटनांनीदेखील याउपर हा अक्षम्य विलंब नको, यासाठी आग्रह धरायला हवा.**

ओबीसी आरक्षणाचा तिढा सुटत नसल्याने गेली दोन वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. हे आरक्षण मिळावे यासाठी राजकारण्यांनी आकाशपाताळ एक करून आपणच कसे ओबीसींचे हितरक्षक आहोत, हे दाखविले. हे अगदी अलीकडचे असल्याने इतर मागासवर्गीयांनाही सारे आठवत असेलच. मात्र, तब्बल सात वर्षांपूर्वी शिफारस होऊन व चार वर्षांपूर्वी मंत्रिमंडळाचा निर्णय होऊनही प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी दोन स्वतंत्र वसतिगृहे अद्याप कागदावरच आहेत. यासाठीची कारणे ऐकली तरी कोणीही सुन्न होईल. प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे ३६ ठिकाणी प्रत्येकी शंभर यानुसार ७ हजार २०० विद्यार्थ्यांसाठी ही वसतिगृहे व्हायची होती. खेड्यापाड्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन व इतर शैक्षणिक सुविधा देण्याचा उदात्त हेतू यामागे होता.





१५ जानेवारी २०१९ ला राज्य मंत्रिमंडळाने यावर मोहोर उमटविली. यात केंद्र सरकारचाही काही वाटा असणार होता. तथापि, केवळ चार जिल्ह्यांत सरकारी जागा मिळाली. उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी अथक प्रयत्न करूनही जागा मिळाली नसल्याची लोणकढी थाप प्रशासनाने ठोकली. जेथे जागा उपलब्ध आहे, असे सांगितले गेले, त्या जिल्ह्यांची नावेही गुलदस्त्यात आहेत. त्यांचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविल्यानंतर त्यांनीही तो गेली तीन वर्षे बासनात ठेवून दिला. जागा मिळत नसल्याने अखेर अशासकीय संस्थांकडे ही वसतिगृहे चालविण्यास देण्याचा घाट घातला गेला.

खासगी संस्थांच्या घशात ही वसतिगृहे घालण्याचा डाव सजग कार्यकर्त्यांनी हाणून पाडला. आता शासनच ही वसतिगृहे चालविणार आहे. जागा नसल्यास इमारती भाड्याने घेण्याचीही तयारी सरकारने दाखविली आहे. या निर्णयाचे स्वागतच आहे. मात्र, इतकी वर्षे त्यासाठी वाया का घालविली, हाच निर्णय यापूर्वीही घेता आला असता. शिवाय जागा उपलब्ध नाही, हे कारण तर निव्वळ धूळफेक दिसते आहे.

विशेष म्हणजे, राजकीय अधिकारासाठी जिवावरही उदार होणारे कार्यकर्ते या शैक्षणिक कार्यासाठी आतापावेतो हाताची घडी तोंडावर बोट या भूमिकेत का राहिले? अशा स्थितीत केंद्र शासनानेही या प्रस्तावाला संमती दिलेली नसताना इमारती भाडेकराराने घेण्याचा निर्णय देखील 'बाजारात तुरी अन्...' या उक्तीचा प्रत्यय आणून देणारा आहे.

# गुरुचे नवीन चंद्र

आपल्या सौरमालेत एक तारा (अर्थातच सूर्य) आणि आठ ग्रह आहेत. सूर्यापासून बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरू, शनी, युरेनस आणि नेपच्यून अशा क्रमाने असलेल्या या ग्रहांपैकी बुध आणि शुक्र यांना चंद्र (उपग्रह) नाहीत. पृथ्वीला एक, मंगळाला दोन, गुरूला (आता) ९२, शनीला ८३, युरेनसला २७ आणि नेपच्यूनला १४ चंद्र आहेत. गुरूच्या चंद्रांपैकी १२ चंद्र अगदी अलिकडे सापडलेले आहेत.



गुरू हा आपल्या सौरमालेतील सर्वांत मोठा ग्रह. त्याचे सूर्यापासूनचे अंतर ७४ कोटी ते ८१.६ कोटी किमीपर्यंत बदलत असते. इतक्या प्रचंड अंतरावर असलेल्या गुरूभोवती फिरणारे पिटुकले उपग्रहसुद्धा तेवढ्याच अंतरावर आहेत. त्यांचा वेध घेण्याचे अवघड काम वैज्ञानिकांनी पार पाडले. सतत एक वर्ष त्या प्रदेशाचा वेध घेतल्यानंतरच ही घोषणा करण्यात आली. अमेरिकेतील कार्नेजी विज्ञान संस्थेतील संशोधक स्कॉट शेपर्ड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गुरूचे हे नवीन १२ चंद्र शोधून काढले आहेत. त्यासाठी त्यांनी हवाई बेटांवरील सुबारू आणि चिली देशातील ब्लांको दुर्बिणी वापरल्या आहेत. विशेष म्हणजे, या चंद्रांना स्वत:चा प्रकाश नाही. ते प्रचंड अंतरावर असलेल्या सूर्याचा मुळात क्षीण झालेला प्रकाश परावर्तित करतात. तो प्रकाश पृथ्वीपर्यंत येतो, तेव्हा अधिकच क्षीण झालेला असतो. तो ग्रहण करून निष्कर्ष काढावे लागतात. साहजिकच हे काम जिकिरीचे असते.

गुरूचे हे चंद्र त्याच्या जन्मानंतर काही काळात निर्माण झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या अभ्यासातून गुरूची निर्मिती कशी झाली यावर प्रकाश पडू शकेल. 'नासा आणि इसा' या दोन संस्थांची दोन निर्मनुष्य अंतराळयाने नजिकच्या भविष्यकाळात गुरूच्या चंद्रांचा अभ्यास करण्यासाठी रवाना होणार आहेत.

**- डॉ. गिरीश पिंपळे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## गॅसचा अवैध वापर; तिघांवर गुन्हा
## १ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर** : अवैधरित्या इलेक्ट्रिक मोटारच्या साह्याने रिक्षात गॅस भरत असताना मिळून आल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध विजापूर नका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. ही घटना दि.१ मार्च रोजी सकाळी पावणेदहा वाजण्याच्या दरम्यान ब्रह्मदेव नगर होडगी रोड सोलापूर येथे घडली.याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक श्रीनाथ लक्ष्मण महाडिक नेमणूक गुन्हे शाखा यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सर्फराज उर्फ बब्बू शफी शेख,अमन अरिफ सय्यद व अब्दुलकरीम साईबाबा शेख (सर्व.रा.स्वामी विवेकानंद नगर,हत्तुरे वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,सरफराज शेख व अमन सय्यद यांनी ब्रह्मदेव नगर येथील एका पत्राच्या खोलीत घरगुती वापरायचे एकूण सात सिलेंडर अवैधरित्या जवळ बाळगून त्यापैकी एका घरगुती वापरायच्या सिलेंडर मधून गॅस काढून अब्दुलकरीम शेख यांच्या ताब्यातील रिक्षा क्रमांक एम.एच.१३.बीव्ही.१२१० यामध्ये इलेक्ट्रिक मोटारच्या साह्याने भरतांना मिळून आले आहे.

## किरकोळ कारणावरून तरुणास मारहाण

**सोलापूर** : किरकोळ कारणावरून तरुणास लाथा बुक्क्यांनी मारून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.२८ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास अरविंद धाम पोलीस लाईन जवळ घडली.याप्रकरणी गणेश दत्तात्रय राजगुरू (वय-२९, रा.हौसे वस्ती, आमराई, दमाणी नगर) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून शुभम उर्फ बल्लम ननवरे, सोमनाथ नन्नवरे यांच्यासह दोन अनोळखी इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हा त्याच्या मोटारसायकलवरून घरी जात असताना रस्त्याच्या कडेला थांबलेल्या चौघांनी फिर्यादीस हाक मारून बोलावून घेतले.व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.तसेच सोमनाथ नन्नवरे याने पडलेला दगड उचलून पाठीत मारून फिर्यादी गणेश राजगुरू याला विटा फेकून मारल्या आहेत.या मारहाणीत गणेश याचा मोबाईल,रोख रक्कम व चांदीचे ब्रेसलेट पडून गहाळ झाले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाही कामूर्ती हे करीत आहेत.

## सामूहिक बलात्कार प्रकरण; आरोपी नरळे याचा जामीन रद्दसाठी अर्ज

**सोलापूर** : येथील गणेश कैलास नरळे (वय-३० रा.गणेश मंदिर जवळ, औसे वस्ती) याला दिलेला जामीन रद्द करण्याकरिता सरकार पक्षातर्फे न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला आहे. ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी आरोपी गणेश नरळे आणि विष्णू बरगंडे यांनी संगनमत करून फिर्यादीस जीवे ठार मारण्याची आणि बदनामी करण्याची धमकी देऊन पुणे येथे नेले. आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला होता. या प्रकरणात फौजदार चावडी पोलिसांनी गणेश नरळे यास अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी गणेश नरळे याचे विरुद्ध भा.द.वि कलम ४१७ अंतर्गत दोषारोपपत्र पाठवून आरोपी विष्णू बरगंडे यास गुन्ह्यातून वगळण्याचा अहवाल न्यायालयात दाखल केला होता. तदनंतर गणेश नरळे याने न्यायदंडाधिकारी कोर्टात जामिन अर्ज दाखल केला होता. त्यावेळी पोलिसांनी जामीनपात्र स्वरूपाचे कलम लावून अहवाल पाठवल्याने कोर्टाने आरोपी गणेश नरळे यास जामीनावर मुक्त केले होते. फिर्यादीचे याचिकेची गंभीर दखल घेऊन उच्च न्यायालयाने सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ केडर आय.पी.एस अधिकाऱ्याने करावा असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी २२ फेब्रुवारी२०२३ रोजी आरोपी विष्णू बरगंडे यास अटक केली होती. यापूर्वी आरोपी गणेश नरळे यास कोर्टाने दिलेला जामीन रद्द करावा. असा अर्ज सरकार पक्षातर्फे दाखल करण्यात आला आहे. उच्च न्यायालयाचे आदेश असताना देखील आरोपी गणेश नरळे याने फिर्यादिवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला, फिर्यादीचे नातेवाईकास दमदाटी केली. याबाबतची कागदपत्रे न्यायालयात सादर करण्यात आली. सदर अर्जाची पुढील सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. या प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे प्रशांत नवगिरे, ॲड.श्रीपाद देशक, ॲड. सिद्धाराम पाटील. सरकारतर्फे ॲड.आसावरी जोशी तर आरोपी तर्फे ॲड.शांतवीर महिंद्रकर हे काम पहात आहेत.

# कसब्यात काँग्रेसच्या रवींद्र धंगेकरांचा विजय;
# टिळक चौकात महाविकास आघाडीचा जल्लोष



**सुराज्य/सोलापूर**

भाजपच्या बालेकिल्ल्यात कसबा विधानसभा पोट निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा विजयी झाले यांचा महाविकास आघाडीच्या वतीने टिळक चौकात जल्लोष करण्यात आला लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास अभिवादन करून हालग्या वाजवून, गुलाल उधळून, फटाक्याची आतषबाजी करत जनतेला लाडू वाटण्यात आले

काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम बरडे शहर प्रमुख विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने हा जल्लोष करण्यात आला.

शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, प्रदेश चिटणीस किसन मेकाले गुरुजी, ज्येष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री, महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, माजी नगरसेवक विनोद भोसले, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, शिवसेनेचे संतोष केंगनाळकर, अमित भोसले, अंबादास करगुळे, लक्ष्मीकांत साका, वाहिद बिजापुरे, महेश लोंढे, प्रवीण जाधव, अंबादास गुत्तीकोंडा, हाजिमलंग नदाफ, शकील मौलवी, नागनाथ कदम, भीमाशंकर टेकाळे, तिरुपती परकीपंडला, दीनानाथ शेळके, विठ्ठल कुऱ्हाडकर, नागार्जुन कुसूरकर, प्रवीण वाले, राहुल वर्धा, विश्वराज चाकोते, अप्पासाहेब बगले, लतीफ शेख, चक्रपाणी गज्जम, विवेक कन्ना, सिद्राम अट्ठेलुर, रूपेश गायकवाड, रजाक कादरी, हारून शेख, भोजराज पवार, गणेश चिंचोळी, गुरुनाथ कोळी, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, नूर अहमद नालवार, सोहेल कुरेशी, शरद गुमटे, शकिल शेख, पृथ्वीराज नरोटे, श्रीकांत दासरी, आदित्य म्हमाणे, महेंद्र शिंदे, मल्लीनाथ सोलापुरे, नागेश बोमड्याल, प्रमिला तुपलवंडे, सुमन जाधव, संघमित्रा चौधरी, शोभा बोबे, महेश सर्वगोड, श्रीशैल रणखांबे, नागनाथ शावने, समीर काझी, धीरज खंदारे, दत्ता लोकरे, वसिष्ठ सोनकांबळे, शाहू सलगर, लहू गायकवाड, अजिंक्य पाटील, पंडित गणेशकर, अप्पा सलगर, नीता बनसोडे, मनीषा भोसले, रेखा बिनेकर, शुभांगी लिंगराज, चंद्रकला निज्मल्लू, प्राजक्ता घाटे, सविता सोनवणे, चंद्रकांत पात्रे, मनोहर चकोलेकर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक बंधुभगिनीं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> भाजपला वठणीवर आणण्यासाठी हीच योग्य वेळ आहे. हे जनतेच्या लक्षात आले आहे. कसबा मतदारसंघ पोटनिवडणुकीतील विजय राज्यातील जनमताचं प्रतिबिंब आहे. ही निवडणूक राज्याला दिशा देणारी आहे. सोलापूर महानगपालिकेवर सुद्धा महाविकास आघाडी विजयी झाल्याशिवाय राहणार नाही.
>
> **-चेतन नरोटे (अध्यक्ष काँग्रेस शहर)**
>
> अठ्ठावीस वर्षे भाजपचा बालेकिल्ला असलेला कसब्यात भाजपचा पराभव झाला. या अगोदर ही पदवीधर, शिक्षक मतदारसंघात सुद्धा चार ठिकाणी महाविकास आघाडी विजयी झाले, फडणवीस यांच्या नागपूरमध्ये ही भाजपचा पराभव झाला. नागपूर गेले, पुणे गेले. महाविकास एकत्रित पणे लढल्याचा परिणाम आहे. आत्ता निवडणुका घ्या विधानसभा आणि लोकसभेत सुद्धा भाजपचा पराभव होईल.
>
> **-पुरूषत्तोम बरडे (जिल्हाप्रमुख)**

# जिल्हा कृषी महोत्सवात २१४ स्टॉल
## एकाच छताखाली उत्पादक ते ग्राहकांना थेट खरेदी व विक्री
### पालकमंत्र्यांच्या हस्ते रविवारी उद्‌घाटन




**सुराज्य/सोलापूर**

कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या वतीने ५ ते ९ मार्च २०२३ या कालावधीमध्ये लक्ष्मी विष्णू मिल मैदानावर भरवण्यात येणाऱ्या जिल्हा कृषी महोत्सवात २१४ स्टॉल उभारले जाणार आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून एकाच छताखाली उत्पादक ते ग्राहकांना थेट खरेदी व विक्री होणार आहे. या महोत्सवाचे उद्‌घाटन रविवारी सकाळी ९ वाजता पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना, उपक्रमांची माहिती देणे, संशोधन, कृषी तंत्रज्ञान व प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास चालना देणे, तसेच धान्य व खाद्य महोत्सवाद्वारे थेट विक्रीला चालना देणे हा कृषी महोत्सवाचा हेतू आहे.

या महोत्सवामध्ये कृषी प्रदर्शन, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री व धान्य महोत्सव, सेंद्रिय अन्नधान्य, कडधान्य, फळे इत्यादी विक्रीचे आयोजन केले आहे. तसेच फळबाग व फुलशेती लागवडबाबत आधुनिक तंत्रज्ञान, बदलत्या हवामानानुसार पीक पद्धती, डाळिंब लागवड तंत्रज्ञान व कीडरोग व्यवस्थापन, सघन आंबा लागवड तंत्रज्ञान, ऊस उत्पादन तंत्रज्ञान, पौष्टिक तृणधान्य आधारित पाककला स्पर्धा व त्यावरील प्रक्रिया संधी, आहार तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पशू संवर्धन, दुग्ध उत्पादन व लंपी रोग व्यवस्थापन याबाबतची माहिती तज्ज्ञ व्यक्तींकडून परिसंवाद, चर्चासत्राद्वारे दिली जाणार आहे.

सुधारित शेती अवजारे, रेशीम शेती, फलोत्पादन, दुग्धव्यवसाय, प्रक्रिया उद्योग, अपारंपरिक ऊर्जा, शेती व्यवसाय तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, सेंद्रिय शेती, हरित पर्यावरण संकल्पना इत्यादी विषयाबाबतची माहिती दिली जाणार आहे. याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे, तसेच, महिला शेतकरी व पाककला विजेत्या महिला यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

कृषी प्रदर्शनामध्ये कृषी निविष्ठा, कृषी सिंचन स्टॉल, कृषी यांत्रिकीकरण स्टॉल, गृहउपयोगी स्टॉल अशा विविध प्रकारच्या स्टॉलची उभारणी करण्यात येणार असून उत्पादक ते ग्राहक दालनाच्या माध्यमातून माफक दरात थेट खरेदी व विक्री करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तसेच, शालेय - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या जिल्हा कृषी महोत्सवास भेट देऊन सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे व आत्माचे प्रकल्प संचालक मदन मुकणे यांनी केले आहे.

# बार्शीतील मुकणे व इतरांना मारहाण
## घरावरील हल्ला प्रकरणातील आरोपींना अटक
### ४ दिवसांची पोलीस कोठडी

**सुराज्य/बार्शी**

येथील आरसीएम फर्टिलायझरचे मालक राजेश मुकणे यांना व त्यांच्या कुटुंबीय, कामगार यांना जबर मारहाण करून तसेच विठ्ठल शिंदे व शिवाजी शिंदे यांनी सात ते आठ अनोळखी व्यक्तींना चिथावणी दिल्याने त्यांनी घरात अनाधिकारपणे प्रवेश करून मुकणे यांना आज सोडायचे नाही असे धमकावून घरातील व्यक्तींना गंभीर दुखापत करून २५ हजार रुपये जबरदस्तीने घेवून जावून तसेच वस्तू व वाहनांचे सुमारे ४ लाख रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी विठ्ठल शिंदे, रेखा शिंदे, शिवाजी शिंदे यांच्यासह सात ते आठ अनोळखी व्यक्तींवर बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

दि १ रोजी रात्री ८.३० च्या सुमारास ही घटना घडली होती. पोलिसांनी रात्रीच या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक केली. पोलिसांनी संशयितांना न्यायालयात उभे केले असता ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

राजेश मुकणे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, विठ्ठल शिंदे व त्याची पत्नी रेखा, त्याचा भाऊ शिवाजी यांनी मी त्याच्या घरासमोरील त्यांनी रस्त्याच्या कडेला लावलेली झाडाची रोपे मी सांगीतल्याच्या कारणावरून नगरपालीकेने काढली असा संशय घेवून माझ्याशी वाद घालून त्याने लोखंडी रॉडने माझे डोकीत मारून जखम केली, तसेच विठ्ठल, रेखा व शिवाजी याने मला हातापायाने तसेच माझ्या पत्नीला विठ्ठल शिंदे याने पाठीमध्ये हाताने मारहाण केली. तसेच आमच्या घरी काम करणारे स्वाती गुरव यांनाही विठ्ठल शिंदे याने रॉडने मारले व छाया पवार यांना लाकडी बॅटने शिवाजी याने पाठीत मारले. त्यानंतर आम्ही हॉस्पिटलमध्ये अडमिट असताना विठ्ठल शिंदे व शिवाजी शिंदे यांनी सात ते आठ अनोळखी आरोपांना चिथावणी दिल्याने सात ते आठ अनोळखी व्यक्तींनी आमच्या घरात अनाधिकारपणे प्रवेश करून मला आज सोडायचे नाही असे धमकावून आमच्या घरातील ४ लाख ३ हजार रू. चे नुकसान केले. घरातील कपाटातील २५ हजार जबरीने घेवुन घरामध्ये काम करणाऱ्या महीलाना निळ्या रंगाच्या फावड्याच्या दांड्याने राधा दिलीप यादव यांच्या डाव्या हाताचे मनगटाजवळील हाड फ्रेंक्चर करण्यास व शोभा देवकाते यांच्या उजव्या हाताचे कोपराजवळ मारहाण केली. अधिक तपास पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे करत आहेत.

# राज्य मराठी पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी जाहीर
## अध्यक्षपदी मनीष केत तर सचिवपदी वसीम अत्तार





**सुराज्य/सोलापूर**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. बीआर न्यूजचे संचालक तथा विद्यमान अध्यक्ष मनीष केत यांची एकमताने फेरनिवड तर लोकशाही न्यूज चॅनेलचे जिल्हा प्रतिनिधी वसीम अत्तार यांची प्रथमच सचिव म्हणून निवड करण्यात आली आहे. रविवारी दि. २६ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्यसंघटक संजय भोकरे आणि ज्येष्ठ सल्लागार आणि दै. सुराज्यचे संपादक राकेश टोळ्ये यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यमान कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीत संघाच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला. यावेळी सदस्यांचे आरोग्य सेवा सुविधा, विविध उपक्रम, वार्तालाप यावर चर्चा झाली. त्यानंतर २०२३-२०२४ च्या कार्यकारिणीत अध्यक्षांना कायम ठेवून नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला. त्यानुसार खालील निवडी करण्यात आल्या. या पदाधिकाऱ्यांच्या निवडी खालीलप्रमाणे करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ - अध्यक्ष मनीष केत (बीआर न्यूज), उपाध्यक्ष मिलिंद राऊळ (दै. लोकमत), उपाध्यक्ष विनोद हुमनाबादकर (टीव्ही न्यूज), सचिव वसीम अत्तार (लोकशाही न्यूज), सहसचिव विश्वभूषण लिमये (साम न्यूज), सहसचिव केवल तिवारी (दै. तरुण भारत), खजिनदार विजय आवटे (येस न्यूज मराठी), सहखजिनदार अभिषेक आदेप्पा (झी २४ तास), प्रसिद्धी प्रमुख अनिल कांबळे (न्यूज १८ लोकमत कॅमेरामन), सहप्रसिद्धी प्रमुख अंबादास पोळ (दै. पुढारी), कार्यकारिणी सदस्य - मनोज हुलसुरे (इन न्यूज), प्रितम पंडित - (न्यूज १८ लोकमत), नितीन कटके (दै. तरुण भारत संवाद), तौसिफ शेख (लाईव्ह सोलापूर), आदित्य केंगार - बीआर न्यूज, मार्गदर्शक मंडळ - युसुफ शेख (दै. दिव्य मराठी), आयुब कागदी (एबीपी माझा)

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TIME EXTENSION NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered contractors of MSETCL. **RFx No. 7000026238 E-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:20/2022-2023 **Particulars:** Construction of 220kV TBC bay at 220 kV Pandharpur & Malinagar substation under EHV O& M Division Solapur. **Estimated Cost:** Rs. 92,94,535/- **EMD: (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 92,945/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST, i.e. Rs. 525/- **Sale Period:** 02.03.2023 to 10.03.2023 **Last Date of Submission:** 10.03.2023 up to 16:00 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 10.03.2023 at 16:30Hrs. (If possible). **Contact Person:** Executive Engineer -77447440613.

For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Solapur**

# भंडारकवठे-अंत्रोळी रस्त्याला जादा निधी देण्याची मागणी





**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे-अंत्रोळी रस्त्याच्या खडीकरणासाठी निधी जादा निधी देण्याची मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे. १३-१२-२०२२ च्या झेडपीच्या पत्रानुसार या रस्त्यासाठी ९ लाखांचा निधी मंजूर केला गेला आहे. त्याचे काम सुरू व्हायचे आहे परंतु हा निधी अपुरा पडत असल्याने उर्वरित रस्त्याच्या कामासाठी आणखीन निधीची आवश्यकता आहे.

या रस्त्याचे खडीकरण करावे म्हणून गेल्या चार वर्षांपासून झेडपीच्या प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. झेडपी प्रशासनाचे सहकार्य लाभत आहे मात्र अपुऱ्या निधीमुळे कामही अर्धवट होत आहे. अनिरूद्ध कांबळे हे अध्यक्ष असताना झेडपीकडून १० लाखांचा निधी दिला गेला. त्यातून केवळ साडेचारशे मीटरपर्यंतच खडीकरण झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिलेल्या तीन लाखांमधून केवळ अडीचशे मीटरचे मुरूमीकरण झाले. नऊ लाखांमध्ये केवळ चारशे ते साडे चारशे मीटरचे खडीकरण होईल, असे सांगितले जात आहे. दक्षिण-दक्षिण-उत्तर दिशेचा हा रस्ता उत्तरेला अजून तसाच निकृष्ट स्थितीत आहे.या रस्त्यावर दोन-तीन ठिकाणी नैसर्गिक पाण्यचा निचरा करण्यासाठी सीडी वर्क करण्याची आवश्यकता आहे.

या रस्त्यावरून शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी-विद्यार्थिनी व शेतमालाची बारा महिने वाहतूक असते. पावसाळ्यात शेतात राहाणाऱ्यांचा गावाशी संपर्क तुटतो. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी या संपूर्ण रस्त्याच्या खडीकरणाचे काम येत्या पावसाळ्यापूर्वी होण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची गरज लक्षात घेवून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी डीपीसीच्या निधीतून जादा निधी या रस्त्यासाठी द्यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. ग्रामीण रस्त्यांसाठी ३०५४ या हेडखाली निधी दिला जातो.या हेडसाठी जादा निधी आल्याचे अधिकृत सूत्रांकडून सांगण्यात आले तेव्हा त्यातून या रस्त्यासाठी जादा निधी द्यावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. गत दोन वर्षात पालकमंत्री व जिल्हा प्रशासन यांच्याकडे सातत्याने निवेदने दिली.ग्रामीण रस्त्यांना डीपीसीच्या निधी शिवाय पर्याय नाही, असे जाणकार सांगतात.

**विठ्ठल कॉर्पोरेशन लि., विठ्ठलराव शिंदेनगर, पो.म्हैसगांव, ता.माढा, जि.सोलापूर**

दि.०२/०३/२०२३

**जाहीर निवेदन**

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी, सभासद व बिगर सभासद सर्वांना कळविण्यात येते की, आपल्या कारखान्याचा सन २०२२-२३ चा गाळप हंगाम मार्चच्या पहिल्या आठवड्याच्या दरम्यान बंद होणार आहे तरी ज्या ऊस उत्पादकांनी गळीत हंगाम २०२२-२३ साठी कारखान्याकडे ऊस नोंदवलेला असेल / नसेल अशा ऊस उत्पादकांनी सदरील ऊस तोडीसाठी शेती विभागाशी संपर्क करावा अथवा स्वतः तोडणी वाहतूक करून कारखाना स्थळावर वरील मुदतीत पोहोच करावा.

वरील मुदतीत कारखान्याकडे ऊस गळीतासाठी न आल्यास अथवा आपला ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिल्यास कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस कारखाना जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
मा.आ.श्री.संजयमामा विठ्ठलराव शिंदे
संस्थापक चेअरमन

सही/-
श्री.यशवंत संजयमामा शिंदे
कार्यकारी संचालक

सही/-
श्री.राजेंद्रकुमार सूर्यकांत रणवरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

**E-tender Notice**

**Health Department, Zilla Parishad Solapur**

Office of District Health Officer Zilla Parishad Solapur inviting E-tender about Purchasing Essential Medicines from Manufacturer & Essential Medical Consumables from Authorized Distributor for the Medicine Store of Zilla Parishad Solapur which is granted for P.H.C. Medicine Purchase in D.P.D.C. Fund 2022-23

Description of tender advertise will be availlable to see on https://mahaterders.gov.in an official web site.

| Name of Items | Tender Form Fee in Rs. | Ernest Money Deposit Rs. | Eligible Participant |
|---|---|---|---|
| Essential Medicines | 20,000/- | 7,50,000/- | Manufacturer Only |
| Essential Medical Consumables | 15,000/- | 2,00,000/- | Authorized Distributor Only |

Sd/-
District Health Officer
Zilla Parishad Solapur



## शक्ती प्राथमिक आश्रम शाळेचे विविध स्पर्धेत यश

**सोलापूर** : दक्षिण सोलापुर तालुक्यातील मूळेगाव तांडा येथील शक्ति प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सब ज्युनियर जिल्हास्तरीय एसआरपी कॅम्प मैदान येथे पार पडलेल्या ८ वर्षे वयोगटातील स्पर्धेत खेळाडूंनी यश मिळवले. ८० मीटर धावणे स्पर्धेत पिंकी राहुल राठोड द्वितीय क्रमाक, अमृत राहुल राठोड - लांब उड़ित द्वितीय, १२ वर्षे वयोगटातील लांब उडी मध्ये पायल पप्पु राठोड प्रथम क्रमाक, राणी रमेश राठोड गोळा फ़ेक मध्ये प्रथम क्रमांक, आठ वर्षे वयोगटातील रिलेमध्ये ४/५० पिंकी राहुल राठोड, रोहनिक भारत राठोड, श्रेया विश्वनाथ पवार आणि संचित भारत राठोड या सर्व विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावीले. या सर्व यशस्वी खेळाडूची कोल्हापुर येथे होणारया राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व क्रिडा शिक्षकाचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष विजय उमाकांत राठोड, शाळेचे मुख्याध्यापक सचिन उमाकांत राठोड, शाळेचे शिक्षक राहुल उमाकांत राठोड यानी केले. या यशासाठी शाळेचे क्रिडा शिक्षक पांडूरंग केत, अविनाश जाधव व शिपाई दत्तात्रेय चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## धंगेकर यांचा विजय पिलीव येथे जल्लोष

**पिलीव** : कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीचे रविंद्र धंगेकर विजय होताच पिलीव येथे त्यांच्या विजयाचा फटाके फोडुन व गुलाल उधळुन जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी उपसरपंच मोहन करांडे, माजी सरपंच अमोल मदने, संग्राम पाटील, कल्याण जावळे, युवा नेते विठ्ठल करांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष कुमार भैस, अजय घाटे, सुरज करांडे, डॉ. मिलींद गुळभिले, दुर्योधन सोलंकर, कुमार लोखंडे, ग्राम पंचायत सदस्य राजेंद्रसिंग जामदार, नितीन कपने, दादा वगरे, मोहन मदने, नाना करांडे, अमित करांडे, भाऊ गोडसे, सागर करांडे, रामचंद्र गोडसे यांच्यसह अनेक मान्यवर यावेळी या जल्लोषात सहभागी झाले होते. यावेळी बोलताना नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण यांनी आगामी निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार निश्चित येईल वाढती महागाई यामुळे सर्व सामान्य नागरिकांना जगणे मुश्किल झाले आहे. यामुळे नागरिकांनमध्ये भाजपा सरकारविषयी रोष आहे.

## विवेकवर्धिनी येथे गुलाब पुष्प देऊन केले परीक्षार्थिंचे स्वागत

**सोलापूर** : श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विवेक वर्धिनी विद्यालय पंढरपूर येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक परीक्षा मंडळाची इयत्ता दहावी परीक्षा केंद्र असून या केंद्रावर पहिल्याच मराठीच्या पेपरला सर्व परीक्षार्थिंना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत व परीक्षेच्या शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये,यांचे हस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देण्यात आले.या केंद्रावर ९ ब्लॉक असून येथे एकूण २०८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.कॉफिमुक्त परीक्षा पार पाडण्यासाठी येथे बैठे पथक,भरारी पथक, पोलिस, होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी उपमुख्याध्यापक तुकाराम कौलगे, पर्यवेक्षक सुनील पाटील, उपकेंद्र संचालक अशोक पवार, राजुभाई मुलाणी, सुनील विश्वासे, दत्तात्रय निकम,सर्व परीक्षा पर्यवेक्षक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परीक्षार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांना निरोप

**अक्कलकोट** : गौडगाव (बु) येथील श्री गुरु सिध्दमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वालचंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. भीमाशंकर बिराजदार होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्था प्रतिनिधी योगीराज हिरेमठ, ज्येष्ठ सल्लागार नागप्पा पाटील, पालक प्रतिनिधी सोमनाथ कुंभार, मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी, पर्यवेक्षक नारायण मोरे यांचे प्रमुख उपस्थिती होती. कुमारी प्रतीक्षा कुंभार, भाग्यश्री आहेरवाडी, पुष्पा खानापुरे, सोलापूरे, भाग्यश्री पाटील आदी विद्यार्थिनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी गुणात्मक दृष्टीने विकास कसा होईल आई-वडिलांची सेवा करणे गुरुजनाबद्दल आदर ठेवणे अशा संस्कारित शिक्षण देणे या सर्व मूल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे. या शाळेनी संस्थेने अविरत संस्कारीत शिक्षण देण्याचे कार्य करत आहे याची मला अभिमान आहे आपण सर्व जण यशस्वी होणार हे सकारात्मक आत्मविश्वास देत सदिच्छा व्यक्त केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता नववी विद्यार्थी व दहावी वर्ग शिक्षक श्री शरणया हिरेमठ श्री लाडाप्पा शिंदे व शिक्षकेतर सेवक वर्ग आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाची सूत्रसंचालन शिवपुत्र चोळे केले तर लाडाप्पा शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

## कस्तुरबाई एज्युकेशनमध्ये कुसुमाग्रज जयंती साजरी

**सोलापूर** : डॉ.वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस हा मराठी गौरव दिन तथा राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. याचे औचित्य साधून कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये मराठी दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात व उदघाटन दीप प्रज्वलन करून व कुसुमाग्रजांच्या प्रतिमा पूजन करून करण्यात आले. या कार्यक्रमात ज्योती अंबिगर, अबोली देशमुख व ज्योती अरकेरी यांनी जय जय महाराष्ट्र माझा या गीताचे सुंदर सादरीकरण केले. त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी मराठी दिनानिमित्त आपली मनोगते व्यक्त केली. उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अश्विन बोंदार्डे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ.विजयकुमार जोकारे यांनी मराठी भाषा दिन आणि कुसुमाग्रज यांचे मराठी भाषेतील योगदान या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे मानद सचिव डॉ.रणजित गांधी व सर्व विश्वस्त यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना अंजली बोरगावकर यांनी केली तर सूत्रसंचालन कोमल धुते व प्रेरणा सपाटे यांनी केले तर आभार विजया नारायणकर यांनी मांडले. तर विशेष कृतज्ज्ञता आकाश कोळी यांनी मानले.

# द्राक्ष उत्पादकांसमोर 'दराचे' अभूतपूर्व संकट

## कोल्ड स्टोअरेज उभारणीसाठी सरकारने मदत करण्याची गरज

सुराज्य/सोलापूर

जिल्हा सह राज्यातील द्राक्ष हंगाम निम्म्यावर आला आहे. मात्र द्राक्ष उत्पादकासमोर या वर्षी दराचे अभूतपूर्व संकट उभे राहिले आहे.

अद्यापही दर वाढत नसल्याने द्राक्ष उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. एक किलो द्राक्ष तयार करण्यासाठी प्रति किलो सुमारे २५ ते ३० रुपये इतका खर्च येत असून, सध्या द्राक्षाला प्रति किलो ३० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे उत्पादन खर्चही निघत नसल्याने द्राक्ष उत्पादक शेतकरी आर्थिक कचाट्यात सापडला आहे.



सोलापूर जिल्ह्यात सुमारे २० हजार एकर तर राज्यात द्राक्षाचे सुमारे ५ ते साडेपाच लाख एकर क्षेत्र आहे. सलग दोन वर्ष कोरोनामुळे फटका बसला. तर गेल्या वर्षी राज्यात अतिवृष्टीमुळे द्राक्ष शेतीवर अतिवृष्टीचे संकट ओढावले होते.

यामुळे द्राक्षाचे पन्नास टक्के नुकसान झाले होते. परिणामी, शेतकरी आर्थिक संकटात सापडला होता.यंदा द्राक्ष हंगामाच्या फळछाटणीपासून पावसाला सुरुवात झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी फळ छाटणी पुढे ढकलली. यामुळे द्राक्ष हंगाम उशिरा सुरू झाला.

हंगामाच्या सुरुवातीला द्राक्षेला चांगला दर मिळाला. वाढत्या थंडीमुळे द्राक्षाचा रंग आणि गोडी वाढली नाही. त्यातच देशांतर्गत बाजारपेठेत द्राक्षाला मागणी हळूहळू वाढू लागली.मात्र जानेवारीमध्ये उत्तर भारतात थंडी वाढली आणि द्राक्षाची मागणी घटली. बाजारात द्राक्षाचा उठाव कमी होऊ लागला.

वास्तविक पाहता फेब्रुवारी महिन्याच्या मध्यानंतर द्राक्षाच्या दर सुधारतील, असे वाटत होते, मात्र दोन महिने झाले तरीही दरात सुधारणा होताना दिसत नाही.

मागील वर्षी दर्जेदार द्राक्षांना प्रति किलोस ६३ रुपये असा दर मिळत होता, त्या द्राक्षांना सध्या प्रति किलोस ३० रुपये दर मिळत आहे. एकूणच द्राक्ष दरातील घसरणीने द्राक्ष शेतकरी अक्षरशः हादरले आहेत. सध्या मिळत असलेल्या दरात उत्पादन खर्चही निघत नसल्याने या आगळ्या संकटातून बाहेर पडण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे. खते, कीटकनाशकांचे वाढलेले दर, वाढलेली मजुरी, पीककर्जाचे हप्ते यांचा मेळही बसू शकत नाही. इतके दर कोसळण्याचा पहिलाच प्रकार या वर्षी पहावयास मिळत आहे.गेल्या पंधरा दिवसांपासून थंडी कमी झाली आहे. यामुळे द्राक्षामध्ये गोडी निर्माण झाली असून, देशांतर्गत बाजारपेठेमध्ये मागणीही वाढली आहे. द्राक्षाचा उठाव होत आहे.

### कोल्ड स्टोअरेजची गरज

या वर्षी हंगामाच्या प्रारंभापासून द्राक्षाचे दर कमी आहे. उत्पादन खर्चही निघणे मुश्किल आहे. तापमानात चढउतार होत असल्याने त्यांचा परिणाम द्राक्षे विक्रीवर होऊ लागला आहे. द्राक्षे विक्री हंगामात निम्म्या वर असून खरेदीसाठी व्यापारी कमी प्रमाणात आले आहेत.तर बांगलादेशच्या बॉर्डर ड्युटी वाढविल्याने द्राक्ष पाठविणे मोठे खर्चाचे झाले आहे. उत्पादन खर्चात मजूर, अवजारे, खत, औषधाच्या किंमतीत भरमसाट वाढ झाली त्यामानाने द्राक्षाच्या भावामध्ये वाढ झाली नाही. १० मार्च नंतर दरात वाढ होईल अशी अपेक्षा आहे. तर सरकारने शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी कोल्ड स्टोरेज उभारण्यासाठी मदत केली तरच बागायतदार जगेल अन्यथा बागा उपडून टाकणे एवढाच पर्याय आहे.

**– आशिष काळे .माजी अध्यक्ष,**
**राज्य द्राक्ष बागायतदार संघ, सोलापूर**

## सोलापूर विद्यापीठाचा श्रीलंकेच्या विद्यापीठाशी सामंजस्य करार

### आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत करण्याची उत्तम संधी : डॉ. फडणवीस

सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि श्रीलंकेच्या कोलोम्बो येथील केलानिया विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या करारामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत होतील आणि विद्यार्थ्यांना त्याचा करिअरमध्ये निश्चित फायदा होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



श्रीलंकेच्या केलानिया विद्यापीठातील सामाजिक विज्ञान विद्याशाखेच्या भूगोल विभागाने पुढाकार घेऊन दक्षिण आशियाई देशांचा समावेश करून आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये केलानिया विद्यापीठ, कोलोम्बो आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी भारतीय उच्च आयोगाचे गोपाल बागले, केलनिया विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. निलांथी डी सिल्वा आणि कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, सोलापूर विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. विनायक धुळप, प्रा. लाल मेर्वीन धर्मासरी, प्रा. ए. जि. अमरसिंघे आणि प्रा. एम. एम. गुणथीलके आदी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या की, सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील राष्ट्रांमध्ये प्रवेश केला आहे. त्यांचा जागतिक भू-राजकारणावर, तसेच दक्षिण आशियातील विकसनशील देशांच्या राजकीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. गेल्या पाच दशकांच्या कालावधीत विशिष्ट देशांमध्ये दक्षिण आशियाई समाज विविध विकास धोरणे राबवित असून विकासाचे विविध स्तर गाठत आहेत.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी भारतातील सोलापूर विद्यापीठाचे डॉ. विनायक धुळप आणि प्यान्जीयाचे अध्यक्ष प्रा. प्रवीण सप्तर्षी, सचिव प्रा. संतोष माने आणि महाराष्ट्र भूगोल परिषदेचे सचिव डॉ. मोरे यांनी परिश्रम घेतले.

## सांगोला येथे स्वच्छता अभियानात प्रतिष्ठानने गोळा केला १६३ टन कचरा

सुराज्य/सांगोला

महाराष्ट्र भूषण, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा जिल्हा रायगड आयोजित महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थरूप श्री नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दीनिमित्त सांगोला शहर येथे डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या वतीने महास्वच्छता अभियान संपन्न झाले.

यावेळी सांगोला तालुक्यातील ७०१ श्री सदस्यांनी च्या माध्यमातून १६३ टनाच्या पुढे ओला व सुका कचरा गोळा करून कचरा डेपो मध्ये पाठवण्यात आला.

यासाठी नगरपरिषद सांगोला कडून ८ घंटागाडी २ टिप्पर, १ जेसीबी तसेच श्री सदस्यांकडून १७ ट्रॅक्टर, ६ छोटा हत्ती यांच्या माध्यमातून सर्व कचरा गोळा केला गेला यासाठी नगरपरिषद सांगोलाचे मुख्याधिकारी सुधीर गवळी, कार्यालय अधीक्षक अधिकारी विजय कन्हेर, आरोग्य अधिकारी विनोद सर्वागोड यांचे विशेष सहकार्य मिळाले. या पुढे प्रतिष्ठानच्या प्रत्येक समाज उपयोगी कार्यक्रमात नगर पालिका संपूर्ण सहकार्य करेल अशी ग्वाही दिली. स्वच्छता मोहीम पूर्ण करून शहर स्वच्छ झाल्याची भावना सर्व प्रशासन व नागरिकांतून व्यक्त होत आहे. आजची स्वच्छता मोहिम प्रतिष्ठानचे ७०१ सदस्यांनी स्वयंस्फूर्तीने करतात याचे मान्यवरांनी कौतुक केले आहे.



## कसब्यातील विजयानंतर अक्कलकोट काँग्रेसकडून जल्लोष

सुराज्य/अक्कलकोट

रविंद्रभाऊ धंगेकर पुणे कसबा विधानसभा मतदार संघात निवडून आल्याबद्दल काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना मित्र पक्षाचा वतीने अक्कलकोट बस स्टँड समोर फटाके फोडून आणि लाडू भरवून विजयी जल्लोष साजरा करण्यात आला.

या प्रसंगी काँग्रेसचे अक्कलकोट शहर अध्यक्ष बसवराज अल्लोळी, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष बाबासाहेब पाटील, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुबारक कोरबु, शहर अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष राहुल मोरे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिलीप भाऊ सिध्दे, शिवराज स्वामी, युसुफ जमादार, मनोज पवार, मल्लिनाथ खुबा, स्वामिराव मोरे, शिवशरण इचगे, अलिबाशा अत्तार, नितीश राठोड, शाकिर पटेल, शिवराज पोमाजी, सतीश चिंचोळी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## नेहरु युवा केंद्रातर्फे युवा संवाद कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

१ एप्रिलपासून देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये समुदाय आधारीत संस्था (सीबीओएस) मार्फत 'YUVA SAMVAD - INDIA @२०४७ कार्यक्रम' आयोजित करत आहे. १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२३ पर्यंत जिल्ह्यातील विविध (सीबीओएस) (समुदाय आधारित संस्था) यांच्या सहकार्याने आणि पाठिंब्याने हा कार्यक्रम जिल्हा स्तरावर आयोजित करण्याचे नियोजित आहे.

पंतप्रधानांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाखाली, भारत आझादी का अमृत महोत्सव साजरा करत आहे आणि स्वातंत्र्याचे ७५ वे वर्ष आणि तिच्या लोकांचा, संस्कृतीचा आणि कर्तृत्वाचा गौरवशाली इतिहास साजरा करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात पंचप्राण या मंत्राची घोषणाही केली होती. अमृतकालच्या युगात भारताची दृष्टी @२०४७. या संदर्भात युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय आणि त्यांची स्वायत्त संस्था नेहरु युवा केंद्र संघटना (एनवायकेएस), जे पंचप्राणाच्या अनुषंगाने देशाच्या भवितव्यावर सकारात्मक प्रवचन निर्माण करण्यासाठी जिल्हा एनवायकेएससोबत हातमिळवणी करतील. पंतप्रधानांच्या कल्पनेनुसार हा कार्यक्रम टाऊन हॉल स्वरुपात आयोजित केला जाईल. ज्यामध्ये तज्ञ/जाणकार व्यक्ती पंचप्राण वर चर्चेचे नेतृत्व करतील आणि त्यानंतर प्रश्नोत्तर सत्रात किमान ५०० तरुण सहभागी होतील. आयोजक सीबीओएसला कार्यक्रमाच्या संस्थेसाठी २०००० पर्यंतप्रतिपूर्ती केली जाईल. निकषांची पूर्तता करणारे इच्छुक सीबीओ त्यांचे अर्ज जिल्हा नेहरु युवा केंद्राकडून मिळू शकणाऱ्या विहित अर्जाच्या प्रोफॉर्मामध्ये पाठवू शकतात. अधिक तपशीलासाठी एनवायके सोलापूर येथे (०२१७-२९५०२४०) किंवा (मो. नं. ९९७५००४८९२) संपर्क साधण्याचे यावेळी आवाहन करण्यात आले आहे.

## भंडीशेगांव येथे ग्राम सुरक्षा यंत्रणेची कार्यशाळा

सुराज्य/पंढरपूर

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने परस्परांशी संपर्कासाठी नानाविध साधने बनवली व त्याचा वापर करून मानव प्रगती करत आहे. संपर्काची कधी नव्हती एवढी प्रचंड साधने आज जगात उपलब्ध आहेत त्याचा वापर करून गाव पातळीवर गावाची सुरक्षाव्यवस्था निर्माण करावी असे मत ग्राम सुरक्षा यंत्रणा चे जिल्हा समन्वयक विक्रमसिंह घाटगे यांनी यावेळी व्यक्त केले, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच विजय पाटील उपस्थित होते. ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून मदत मिळू शकते अशी माहिती ग्राम सुरक्षा यंत्रणेचे वरीष्ठ विभागीय अधिकारी गणेश लोकरे यांनी दिली.



प्रत्येक गावात पोलीस स्टेशनकडून ग्राम सुरक्षा यंत्रांना सुरू करण्यात येत आहे, स्थानिक पोलीस ठाण्यात सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते यांना एकत्रित घेऊन ही यंत्रणा उभी केली जाते अशी माहिती पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी दिली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक गोदे, पोलीस कॉन्स्टेबल राजकुमार ढोबळे, एस. बी.माळी, ऐ.के.खर्चे,सरपंच मनीषा येलमार,उपसरपंच विजय पाटील, ग्रामसेवक जी.बी. नरसाळे, डॉ.श्रीधर येलमार, माजी सरपंच राजाभाऊ माने, संजय रणखांबे, संतोष ननवरे, भास्कर ननवरे, प्रकाश येलमार, सोमनाथ विभूते, अनिल जाधव, पोलीस पाटील शरद पाटील उपस्थिती होते.

## सुंदर कलापथकाकडून जनजागृती

**सोलापूर** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय तसेच जिल्हा माहिती कार्यालय सामाजिक न्याय, विशेष सहाय्यक यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदर कलापथक सोलापूर व त्यांचे सहकारी यांनी अनुसूचित जाती व विशेष घटक यांच्यासाठी असणारे योजनांची माहिती दिली.

योजनांची विषय खालीलप्रमाणे, विद्यार्थिनी शिष्यवृत्ती योजना, महिला व बालकल्याण क्रीडा विषय, महिला बचत गट, महिला उद्योगधंदे, अण्णाभाऊ साठे नागरी सुविधा, घरकूल योजना, आरोग्य व पशुसंवर्धन, व्यायाम शाळा अशा अनेक विषयांवर सुंदर कलापथक यांनी गीतगायन व बतावणी पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती केली असून गावांची नावे टेंभुर्णी, मोडनिंब, माढा, म्हैसगांव, निमगांव टें., भोसरे, कुर्डू, कुर्डूवाडी या गावी जाऊन योजना राबविण्यात आले.

यावेळेस कलाकारांचे नावे खालीलप्रमाणे, शाहीर समर्थ, दिलीप तुपसुंदर, विश्वनाथ यमा महापुरे, विठ्ठल गायकवाड, प्रबुद्ध दिलीप तुपसुंदर (ढोलकीवादक, श्रीधर जाधव, अशोक गवळी अशी नावे आहेत.

# महागाईमुळे शेतकऱ्यांना मशागतीचाही खर्च सोसेना

सुराज्य/चिखली

**महागाईमुळे पीक घेणे सोडा, मशागत करणेही वर्षभर कठीण होत चालल्याचे चित्र मोहोळ तालुक्यातील चिखली, हिवरे, यावली, वडाचीवाडी, या भागात पाहायला मिळत आहे.**

आधुनिक युगात शेतकऱ्यांना शेती व्यवसाय करताना बैल जोडी संभाळणे दुरापास्त होत चालले आहे. बैलाला चारा विकत घेणे शेतकऱ्यांना परवडेनासे झाले आहे. कडबा, पेंडीचे भाव सुध्दा गगनाला भिडले आहेत. त्यामुळे उसनवारी करूनच शेतकरी यांत्रिक शेतीला प्राधान्य देताना दिसत आहेत. त्यात पाणीटंचाईचे सावट अनेकदा तीव्र होत असते. परिणामी शेतकरी शेतात नवनवीन प्रयोग करत कुटुंबाचा गाडा हाकत आहे. काही शेतकऱ्यांच्या अंगणात दिसणाऱ्या बैल जोडीची जागाही आता ट्रॅक्टरसारख्या यंत्राने घेतली असून नांगरणी पेरणी व इतर शेती मशागतीची कामे पारंपरिक पद्धतीने करत आहेत. तरीपण शेतात कष्ट करून पिकांना म्हणावा तेवढा मोबदला मिळत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस शेती करणे परवडत नसल्याचे चित्र समोर आले आहे. ट्रॅक्टर हाच यांत्रिक शेतीचा केंद्रबिंदू बनत चाललेला आहे.



दहा बारा वर्षांपूर्वी ट्रॅक्टरचा वापर हा मर्यादित होता. परंतु आता पारंपरिक शेतीला फाटा देऊन काही शेतकरी आधुनिकतेची कास धरू लागला आहे. शेतात नांगरणीपासून पीक निघेपर्यंत शेतकऱ्यांना पैसा खर्च करावा लागतो. पेरणीपूर्व मशागतीसाठी शेतकऱ्यांना ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करून मशागत करून पेरणी करावी लागते. त्यामुळे प्रत्येक पिकाला काढणीपर्यंत अधिक खर्च येतो. पीक आल्यानंतर योग्य तो भाव मिळत नसल्याने उत्पादनापेक्षा खर्च अधिक अशी परिस्थिती आहे. डिझेलचे दर सुद्धा वाढत असल्याने ट्रॅक्टरचे भाडे दिवसागणिक वाढत चालले आहे. त्यामुळे शेतीच्या मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मशागतीसाठी उसनवारी करावी लागत आहे. पेट्रोल आणि डिझेलचे दर सरकारने कमी करावे अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.



## विद्यार्थ्यांनो बोर्ड परीक्षेला घाबरू नका : केंद्रप्रमुख घंटे

**अकलूज** : अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयात इयत्ता १० वीच्या बोर्ड परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत विद्यालयाचे उप मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख दत्तात्रय घंटे, उच्च माध्यमिक विभागप्रमुख शिंदे, करंडे, पर्यवेक्षक व शिक्षकांनी गुलाब पुष्प व पेढे देऊन केले. केंद्रप्रमुख दत्तात्रय घंटे सरांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचे महत्त्व सांगितले. त्यात आयुष्यात दहावी परीक्षेला तर खुप महत्त्व दिले जाते. बारावीच्या विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या परीक्षेचा अनुभव घेतलेला असतो, पण दहावीचे विद्यार्थी बोर्ड' या नावानेच अर्धे घाबरलेले असतात. त्यामुळे चांगला अभ्यास, पाठांतर करूनही उत्तरपत्रिका व्यवस्थितपणे लिहिता येत नाही. त्यामुळे गुण कमी पडतात. मुलांची बोर्डाची भीती दूर व्हावी आणि उत्तम पद्धतीने उत्तरे लिहावी थोडक्यात सांगून शुभेच्छा दिल्या. तसेच प्रश्नपत्रिका मिळताच सर्व प्रश्नांवर नजर फिरवून तुम्हाला एकूण प्रश्नांपैकी जो तुम्हाला सोपा वाटतोय व पूर्ण प्रश्नाचे उत्तर लिहिता येतेय तो प्रश्न लिहिण्यास घ्या. उत्तर येतंय म्हणून घाई करू नका. प्रश्न वाचून समजून घ्या कारण घाईघाईत वाचन केल्याने मुख्य मुद्दा दुर्लक्षित राहुन उत्तर चुकू शकते. बोर्डाने कुठेही असे सांगितले नाही की प्रश्न क्रमांकानुसारच उत्तरपत्रिका सोडवा. तुम्हाला जो प्रश्न आवडेल, सोपा वाटेल तो सोडवा. खात्री असलेले प्रश्न आधी सोडवावे. त्यामुळे पेपर तपासणाऱ्यावर चांगले इम्प्रेशन' पडेल. या केंद्रावर १० वी बोर्ड परीक्षेसाठी ५६० विद्यार्थी बसले आहेत. बोर्डाच्या नियमाप्रमाणे सर्व व्यवस्था केलेली आहे.



## धंगेकर यांचा विजय; अक्कलकोट बसस्टॅन्डसमोर जल्लोष

**अक्कलकोट** : रविंद्रभाऊ धंगेकर यांची पुणे कसबा विधानसभा मतदार संघाच्या आमदारपदी निवड झाल्याबद्दल काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना मित्र पक्षाचा वतीने अक्कलकोट बस स्टँड समोर फटाके फोडून आणि लाडू भरवून विजयी जल्लोष साजरा करण्यात आला.या प्रसंगी काँग्रेसचे अक्कलकोट शहर अध्यक्ष बसवराज अल्लोळी, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष बाबासाहेब पाटील, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुबारक कोरबु, शहर अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष राहुल मोरे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिलीप भाऊ सिद्धे, शिवराज स्वामी, युसुफ जमादार, मनोज पवार, मल्लिनाथ खुबा, स्वामिराव मोरे, शिवशरण इचगे, अलिबाशा अत्तार, नितीश राठोड, शाकिर पटेल, शिवराज पोमाजी, सतीश चिंचोळी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी प्रामाणिक व जिद्दीने प्रयत्न केल्यास यश निश्चित : शिंदे

**पिलीव** : सध्या स्पर्धेचे युग असुन विदयार्थीनी प्रामाणिकपणे व जिद्दीने सातत्य ठेवुन प्रयत्न केल्यास कोणत्याही स्पर्धा परीक्षेत हमखास यश मिळते, असे मत माजी मुख्याध्यापक शिंदे यांनी विदयार्थयाना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. ते पिलीव येथे भाग्योदय क्ल्लासेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांच्या शुभचिंतन कार्यक्रमात बोलत होते.प्रास्ताविक अमोल खलीपे सर यांनी केले तर यावेळी लवटे, दामोदर लोखंडे सर,गाढवे यांनी विदयार्थीना परीक्षेसाठी उपयुक्त असे मार्गदर्शन केले तसेच भविष्यात विदयार्थना अश्या अनेक परीक्षांना सामोरे जायचे असुन दहावी हा पाया आहे. स्पर्धात्मक परीक्षेतुनच मोठ मोठे अधिकारी व्हायची संधी मिळते असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमास जवाहर शेतकी विदयालयाचे माजी मुख्याध्यापक शिंदे, लवटे, दामोदर लोखंडे, प्रमोद भैस, विशवजित गोरड, धसाडे, गाढवे, काटे, संजय पाटील, अमोल खलीपे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

## सामाजिक जाणीव लोकहितासाठी दिशादर्शक : प्रा. झपके

**सांगोला** : लायन्स क्लबमध्ये प्रत्येकाच्या मनामधील सामाजिक बांधिलकीची भावना सेवाभाव निर्माण करणारी आहे. त्यातूनच अनेक कल्याणकारी कार्यात मोफत नेत्रचिकित्सा व मातीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, अंधासाठी सर्व प्रकारचे सहाय्य, गरजूंना व अपंगांना वैद्यकिय उपचार उपलब्ध करून देणे, शैक्षणिक ,आरोग्यविषयक व सामाजिक सेवाकार्य अशा विधायक कार्याला प्राधान्य दिले जाते. तसेच पर्यावरण रक्षण, युवकांसाठी कार्य, नागरिकत्व व देशभक्तीची जाणीव, गरजूंना मदतीचा हात इत्यादीवरही लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे ही जाणीव लाकहितासाठी दिशादर्शक आहे. असे प्रतिपादन ला.प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी केले. माजी प्रांतपाल ला.प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचा लायन्स क्लब ऑफ सांगोला कडून अध्यक्ष ला. प्रा.धनाजी चव्हाण यांच्या हस्ते सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सांगोला येथे सत्कार संपन्न झाला.

सुराज्य Classified

**विवाह विषयक**

वधु - २६, ५.३, गोरी, १२ वी, शिवणकाम. हिंदु मराठा, वडील नाहीत. मुलगी दत्तक आहे. शेती ४ एकर, एकुलती एक मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल.मो.**7517049173/ 8446068427**

**विकणे आहे**

**जमीन विकणे आहे.**

खळवे (माळशिरस) येथील ग.नं.३३३/१/अ क्षेत्र ०.२५५० पो.ख.क्षेत्र ०.०२.०० हे.चौ.मि. एकूण २७ आर जमिन विकणे आहे. संपर्क : नितीन विठ्ठल माने **9960900397**

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर

संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

# अर्थवाहिनी कासाळगंगा प्रकल्प प्रदूषणमुक्त अन् बारमाही वाहण्यासाठी अभ्यास पूर्ण

**सुराज्य/सांगोला**

सांगोला, पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील २३ गावे-वाड्यांची अर्थवाहिनी असलेला कासाळगंगा प्रकल्प प्रदूषणमुक्त अन् बारमाही वाहण्यासाठी अभ्यास पूर्ण झाला.

कासाळगंगा प्रकल्प अविरल-निर्मल- स्वतंत्र वाहत रहावा यासाठी आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक ग्रामस्थ, तरुण, ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी यांनी अभ्यास केला. त्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे पंढरपूर येथील कर्मवीर डॉ. भाऊराव महाविद्यालय, भूगर्भ अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर, पर्यावरण अभ्यासक डॉ अजित गोखले, सामाजिक तज्ज्ञ डॉ सुमंत पांडे, डॉ सोमिनाथ घोळवे आदींनी अभ्यास विषयक मार्गदर्शन केले. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव निमित्त महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभागातर्फे महाराष्ट्रातील ७५ नद्या अमृतवाहिनी करण्यासाठी 'चला जाणूया नदीला' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यात भीमा, माणगंगा, कासाळगंगा, आदिला, धुबधुबी, कोरडा या नद्यांच्या समावेश आहे. या उपक्रमात नदी



संवाद यात्रा सर्वत्र झाल्या आहेत. नदी संवाद यात्रा जोडीला कासाळगंगा प्रकल्पात समाविष्ट असलेल्या कटफळ, चिकमहूद, महूद, महिम, खिलारवाडी, गायगव्हाण, गारडी, लोणारवाडी, पळशी, सुपली, उपरी, भंडीशेगाव, वाडीकुरोली, शेळवे, बचेरी, शिंगोर्णी, कोळेगाव या गावांमध्ये शिवारफेरी झाली. त्यात सरपंच, उपसरपंच, सदस्य, शेतकरी, ज्येष्ठ ग्रामस्थ, ग्रामसेवक, तलाठी, वन कर्मचारी, कृषी व जलसंपदा, लघू पाटबंधारे विभाग अधिकारी सहभागी झाले होते. सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, वन विभागाचे प्रमुख धैर्यशील पाटील, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता साळी यांनी 'चला जाणूया नदीला' या उपक्रमात मोलाचे सहकार्य केले. शासकिय सर्व विभागाच्या अधिकारी-कर्मचारी यांची साथ लाभली अशी माहिती कासाळगंगा समन्वयक बाळासाहेब ढाळे यांनी दिली. शिवार पाहणी आणि अभ्यासातून पुढे आलेल्या मुद्द्यांचे विश्लेषण करून कृषी विभागाचे निवृत्त अधिकारी शशिकांत महामुनी, अभियंता अनिकेत महाजन यांनी लोक अभ्यास आधारित अहवाल तयार केला आहे, असे सांगून श्री ढाळे यांनी जैवविविधता आणि आर्थिक बदल या अभ्यासासाठी योगदान दिल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अध्यक्ष संजीव पाटील, पंढरपूर कॉलेजचे प्राचार्य डॉ चंद्रकांत खिलारे आणि त्यांच्या सर्व प्राध्यापक, विद्यार्थ्यांचे आभार मानले.

### मुनगंटीवार आणि डॉ.सिंह यांची शुक्रवारी महूदमध्ये होणार सभा



'चला जाणूया नदीला' हा उपक्रम राबविण्याचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्राचे वने-सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला आहे. कासाळगंगा प्रकल्पाचा लोक अभ्यास आणि कृती अहवाल मुनगंटीवार यांना सादर केला जाणार आहे. मुनगंटीवार यांचे प्रमुख मार्गदर्शन महूद बुद्रुक (ता सांगोला) येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर 'चला जाणूया नदीला' उपक्रमात शुक्रवारी (ता ३ मार्च) दुपारी एक वाजता संवाद सभा होईल. यावेळी आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ राजेंद्र सिंह यांचे मार्गदर्शन होणार आहे. अभिनेते चिन्मय उदगीरकर, जलबिरादरीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष नरेंद्र चुग यांच्यासह 'चला जाणूया नदीला' उपक्रम च्या राज्यस्तरीय समिती चे सदस्य उपस्थित राहणार आहेत.



## श्रीक्षेत्र मार्डी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**उत्तर सोलापूर** : श्रीक्षेत्र मार्डी येथे तुकाराम महाराज बिजेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन शनिवार दि ४ फेब्रुवारीपासून नृसिंह मंदिरात होणार आहे, अशी माहिती श्री नागनाथ देवस्थानचे खर्गे, नागेश स्वामी महाराज, रुक्मिणीदेवी भजनी मंडळाचे संभाजी पवार यांनी दिली. मार्डी मधील पांडुरंग भजनी मंडळ, संत शिरोमणी सावता माळी भजनी मंडळ, इंद्रायणी भजनी मंडळ, विठाई महिला भजनी मंडळ, नागनाथ भजनी मंडळ, श्री विठ्ठल बिरुदेव ओवी भजनी मंडळ व समस्त मार्डी ग्रामस्थांच्या वतीने हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि. ४ ते शुक्रवार दि. १० पर्यंत चालणा-या या रौप्य महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे पाच ते सहा काकडा, सकाळी सात ते दहा तुकाराम गाथा पारायण, सकाळी ११ ते दुपारी १ गाथा भजन, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, रात्री साडेआठ ते साडेदहा कीर्तन व रात्री साडेदहा नंतर हरिजागर होणार असून शनिवार दि. ४ रोजी सकाळी सात वाजता वीणा उभा करण्यात येईल. या दिवशी परभणी येथील तुकाराम महाराज बोकारे यांचे कीर्तन, रविवार दि. ५ रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथील चैतन्य महाराज देगलूरकर, सोमवार दि. ६ रोजी सेलू येथील उमेश महाराज दशरथे, मंगळवार दि. ७ रोजी सायंकाळी सहा वाजता अर्जून लाड गुरुजी महाराज, बुधवार दि. ८ रोजी माणकोजी बोधले महाराज यांचे विद्यमान वंशज ॲड.जयवंत बोधले महाराज, गुरुवार दि. ९ रोजी सकाळी १० वाजता सचिन जोशी महाराज यांचे गुलालाचे कीर्तन व रात्री नऊ वाजता तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज कान्होबा महाराज देहूकर यांचे कीर्तन होईल. शुक्रवार दि. १० रोजी सकाळी सात वाजता गावातून दिंडी नगरप्रदक्षिणा निघेल. सकाळी दहा वाजता तुकाराम महाराज यांचे वंशज बापूसाहेब देहूकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहामध्ये बाणेगाव, नरोटेवाडी, वडगाव, जळकोटवाडी, सावरगाव, राळेरास, सांगवी, पांगरदरवाडी, गंगेवाडी, उळे, हगलूर, नान्नज, केगाव, होनसळ, तरटगाव, गुळवंची, कोंडी, गावडीदारफळ, कारंबा, कासेगाव, तामलवाडी या गावातील भजनी मंडळांचा हरिजागर होईल. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मार्डी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जेऊर येथे १२ सीसीटीव्हींचे लोकार्पण

## काळानुसार सुधारणा करण्याचे काम अनुकरणीय : सिरसट

**अक्कलकोट** : जेऊर ग्रामपंचायतीने बदलत्या काळानुसार गावात बसविलेली सिसिटीव्ही यंत्रणा काळाची गरज असून काम निश्चित अनुकरणीय असल्याचे मत तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी व्यक्त केले.

ते जेऊर येथे बसविलेल्या १२ उच्च क्षमतेच्या सिसिटीव्हीच्या लोकार्पण प्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील हे होते. प्रारंभी प्रतिमा पूजन करून फीत कापून सिसिटीव्ही यंत्रणेचा शुभारंभ केला गेला. यावेळी तहसीलदार बाळासाहेब सिरसट, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, प्रशिक्षणार्थी तहसीलदार संतोष कांबळे, ज्येष्ठ समाजसेवक म्हांतेश पाटील, नागनाथ सुरवसे, उपसरपंच काशीराया काका पाटील, शिवाजी कलमदाणे, अंबाराया कनोजी, काशिनाथ कडगंची,रमाकांत भासगी, सचिन चव्हाण, शिवानिंगप्पा पत्रिगीडा, सुरेश सोनार, सुरेश कोळी आदींची प्रमुख उपस्थिती होती. जेऊर येथील काशिलिंग मंदिर परिसर, मेन रोड, स्टेशन रोड, सोलापूर रोड, ग्रामपंचायत परिसर, बसस्थानक आदी



ठिकाणी बरा सिसिटीव्ही बसविण्यात आले असून आणखी २२ सिसिटीव्ही बसविण्याची क्षमता तयार ठेवण्यात आली आहे.

पुढे बोलताना सिरसट म्हणाले की, गावात सिसिटीव्ही बसविल्याने प्रशासनावर असलेला गाव सुरक्षेचा ताण कमी होणार असून गुन्हेगारी कमी होऊन वातावरण चांगले होण्यास मदत होणार आहे.पोलीस निरीक्षक स्वामी म्हणाले की, पूर्वी गावातील बुजुर्ग लोक सिसिटीव्ही सारखेच काम करून गावात सलोखा ठेवायचे पण आता नवी पिढी आली, गरजा बदलल्या तसेच अनेक गोष्टी बदलत गेल्या त्यासोबतच गुन्हेगारी स्वरूप देखील बदलले त्यासाठी सिसिटीव्ही यंत्रणा अतिशय उपयुक्त ठरणार असून जेऊर ग्रामपंचायतीचे काम हे प्रशंसनीय आहे. शेवटी जिल्हा परिषद कृषी माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी मनोगत व्यक्त करून सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानले. दरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान गावकऱ्यांनी केला.

यावेळी इरण्णा कणमुसे, नागनाथ तळवार, सिद्धाराम कापसे, इरप्पा कोळी, रेहमान अत्तार, भीमाशंकर वग्गे, सुनील जाधव, उमाकांत राठोड, काशिनाथ कळवंत, प्रकाश ननवरे, गंगाधर इरशेट्टी यांच्यासह ग्रामपंचायत व सोसायटी सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन अजगोंडा यांनी केले तर आभार तुकाराम दुपारगुडे यांनी मानले.

## चोरट्याने दोन मोबाईलसह दुचाकी पळवली

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने दोन मोबाईलसह दुचाकी चोरून नेल्याची घटना दि.२८ फेब्रुवारी २०२३ ते १ मार्च २०२३ दरम्यान अंबिका नगर अक्कलकोट रोड येथे घडली.याप्रकरणी अनिल भिकाजी मोरे (वय-४९,रा. अंबिका नगर,अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी यांची दुचाकी व तसेच फिर्यादी अनिल मोरे व त्यांची मुलगी वापरत असलेले दोन मोबाईल चोरून नेले आहे.फिर्यादी यांनी हवा येण्यासाठी दरवाजा उघडा ठेवून झोपले ही घटना घडली.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

## रयत संस्थेवर निवड; कोळावासीयांकडून दीपकआबांचा रविवारी सत्कार

**सांगोला** : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष, माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांची नुकतीच पेट्रोनमधून रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रयत सारख्या लोकप्रिय शिक्षण संस्थेत आपल्या हक्काचा माणूस नियुक्त झाल्याबद्दल कोळा (ता. सांगोला) येथे रविवार दि ५ मार्च रोजी सायं. ५ वा. अर्जुन चौक, कोळा येथे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी दीपक साळुंखे- पाटील यांचा नागरी सत्कार आयोजित केला आहे.



संपूर्ण कोळा आणि तालुक्याचे शक्तीपीठ असलेल्या १०८ श्री.श्री.श्री.रूद्रपशुपती कोळेकर महास्वामीजी यांच्याहस्ते मा. आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांचा हा नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार समारंभास महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या महिला अध्यक्षा स्वातीताई शिंदे पवार व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे सल्लागार लहू कांबळे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

कोळा आणि साळुंखे पाटील परिवार हे सबंध नेहमीच सलोख्याचे आणि सख्याचे राहिले आहेत. कोळा परिसरातील नागरिकांच्या सुख दुःखात साळुंखे पाटील परिवार नेहमीच प्रकर्षाने सहभागी असतो. त्यामुळे या परिसराने नेहमीच आपल्या कुटुंबातील एक सदस्य याच नात्याने मा आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यावर निरपेक्ष भावनेने प्रेम केले आहे. याच प्रेमातून रविवारी हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या नागरी सत्कार समारंभास कोळा आणि परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सरकारचा सर्वसामान्यांना गॅस दरवाढीचा झटका

**पिलीव** : केंद्र सरकारने सर्व सामान्यांना गॅस दरवाढीचा झटका दिला आहे यामुळे सर्व सामान्य नागरिकामध्ये चांगलीच संतापाची लाट पसरली आहे.एकतर पेट्रोल डिझेल चे दर गगनाला भिडल्यामुळे सर्व सामान्य हैराण झाले असतानाच मोदी सरकारने घरगुती तसेच व्यावसायिक गॅस दरात प्रचंड मोठी वाढ केली आहे.




घरगुती गॅसच्या दरात तब्बल ५० रुपयांची वाढ केली आहे यामुळे आता घरगुती गॅसचे सिलेंडर आता ११३० रुपयाला मिळेल ते पुर्वी १०८० रुपयाला मिळत होते.तर व्यावसायिक १९ किलोचे सिलेंडर १८४० रुपयाला मिळत होते त्यामध्यें आता ३५० रुपयांची वाढ झाल्यामुळे २१९० रुपयास झाले. यामुळे हॉटेल व्यवसायिक तसेच छोटे छोटे वडा-पाव, किंवा लहान चहाच्या टपरीत व्यवसाय करणारे व्यवसायिक दरवाढीने चांगलेच अडचणीत आले आहेत. वाढत्या गॅसच्या दराने छोटे व्यावसायिक जसे अडचणीत आहेत. तसेच जे मजुरी करुन जगतात त्यांना आता गॅस सिलेंडर घेणे दुरापास्त होणार आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंब पुन्हा चुलीकडे वळणावर हे निश्चित झाले आहे. केंद्र सरकारने अगोदर उज्वला योजनेअंतर्गत गोरगरीबांना गॅस कनेक्शन मोफत दिले त्यावर सबसिडी दिली. नंतर सबसिडी बंद केली. आता मोठा दरवाढीचा निर्णय घेतला.

सर्व सामान्य जनतेला महागाईच्या विळख्यातून बाहेर काढणे आवश्यक असताना शासन महागाईच्या विळख्यात ओढत आहे. यामुळे सध्या सर्व सामान्य नागरिक सरकारवर नाराज असुन आगामी निवडणुकीत याचा सरकारला मतरुपी तोटा होऊ शकतो. त्यामुळे सरकारने आताच महागाई कमी करुन सर्व सामान्य जनतेला दिलासा देणे आवश्यक आहे.

# आवताडे शुगर ॲन्ड डिस्टिलरीज्च्या प्रथम गळीत हंगामाची सांगता

## कामगारांना १५ दिवसांचा बक्षीस पगार देणार : आवताडे

**सुराज्य/मंगळवेढा**

आवताडे शुगर अँन्ड डिस्टिलरीज चा प्रथम गळीत हंगाम सांगता समारंभ श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णूपंत आवताडे यांच्या हस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रमावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती सोमनाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, मारापुरचे सरपंच विनायक यादव, कार्यकारी संचालक मोहन पिसे, रमेश पवार, संपत अटकळे, वसंत लेंढवे, दामोदर रेवे भारत निकम,विजय माने, पप्पू काकेकर,परमेश्वर येणपे, सतीश पाटील आदि प्रमुख मन्यावर उपस्थित होते. कारखान्याचे मार्गदर्शक तथा पंढरपूर मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे यांचे कुशल मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी, कर्मचारी, ऊसतोडणी कामगार, वाहतूक ठेकेदार यांच्या अथक



परिश्रमामूळे आवताडे शुगरने प्रथम गळीत हंगामामध्ये अल्पावधीत ४ लाख २ हजार ५५५ इतके गाळप केले करून ३ लाख ८० हजार ३०० पोत्यांचे साखर उत्पादन केले अशी माहिती आवताडे शुगरचे चेअरमन संजय आवताडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

या गळीत हंगामामध्ये ट्रक/ ट्रॅक्टर, डंपींग व बैलगाडी सर्वात जास्त वाहतूक करणाऱ्या ऊस वाहतूकदारांमध्ये प्रथम क्र. दामाजी शामराव बंडगर, अंबादास पांडुरंग लवटे, गोविंद बाबासाहेब खेंगरे, द्वितीय क्र. दादासो राजाराम लेंडवे, अनिल शिवाजी घोळवे, मनोहर त्रिबंक जाधव, तृतीय क्र. सिध्दलिंग सुरेश कोळी, सुनिता बाबासो माने, लिंबाजी दादाराव जाधव, यांनी सर्वात जास्त वाहतूक ऊसस वाहतूक केली असल्याने ठेकेदार यांना उत्तेजनार्थ बक्षिस बहाल करुन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सभापती सोमनाथ आवताडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आज आवताडे शुगरने कामगार वर्गाच्या कार्यकुशल कामगिरीमुळे प्रथम गळीत हंगाम यशस्वीरीत्या पार पाडू शकलो असले बाबतचे सांगून कामगारांना पंधरा दिवसांचा बक्षिस पगार देऊन त्याचा ही सन्मान ठेवण्याचे काम आवताडे शुगर करत असल्याचे सांगितले. यावेळी कारखान्याचे दिलीप जाधव, मोहन पवार, रघूनाथ उन्हाळे, डेप्युटी श्रीकांत रोंगे, सुरेश निर्मळ, ज्ञानेश्वर बळवंतराव, मिनहाज शेख, चंद्रकांत राठोड, रणजित पवार अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक, वाहतुक ठेकेदार व शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांचा उत्पन्न वाढीस आवताडे शुगर ने आधुनिक पद्धतीने तयार केलेले कल्चर मिश्रीत कंपोस्ट खत भरनीसह प्रति टन १०५०/- या अत्यल्प दरामध्ये कारखाना स्थळावर उपलब्ध केलेला आहे तरी यांचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी व व्यवसायिकांनी घ्यावा.

**- मोहन पिसे, कार्यकारी संचालक, आवताडे शुगर**

# नागालँडमध्ये आठवले गट दोन जागांवर विजयी

✔ सुराज्य/नागालँड

नागालँडमध्ये भाजपा युती सत्तास्थापनेच्या दिशेने वाटचाल करत असताना महाराष्ट्रातील पक्षांनीही आपली छाप सोडली आहे. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार पाच ठिकाणांवर आघाडी असताना दुसरीकडे रामदास आठवलेंच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने इतिहास रचला आहे.



आठवले गटाने नागालँडमध्ये निळा झेंडा फडकावला असून दोन उमेदवार विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात एकही आमदार नसणाऱ्या आठवले गटाचे थेट नागालँडमध्ये आमदार निवडून आल्याने चर्चा रंगली आहे.

राज्यात एकीकडे कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीमुळे राज्याच्या जनतेचं लक्ष लागलं असताना रामदास आठवले यांनी थेट नागालँडमध्ये आपली छाप पाडली आहे. नागालँड विधानसभा निवडणुकीत टूएनसंद सदर- २ विधानसभा मतदारसंघात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) अधिकृत उमेदवार इम्तिचोबा विजयी झाले आहेत. इम्तिचोबा ४०० मतांच्या फरकाने विजयी झाले आहेत. त्यांना एकूण ५५१४ मतं मिळाली. तसंच नोकसेन विधानसभा मतदारसंघातून वाय. लिमा ओनेन चँग विजयी झाले आहेत. त्यांनी ५१५१ मतं मिळाली आहेत.

नागालँडमधून 'ऊस शेतकरी' या निशाणीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या उमेदवारांनी निवडणूक लढली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने एकूण आठ ठिकाणी आपले उमेदवार उभे केले होते. यामधील दोन उमेदवार विजयी झाले आहेत अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली आहे.

# विशेष समितीच्या शिफारशीवरुन होणार निवडणूक आयुक्तांची नियुक्ती

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**निवडणूक आयोगाच्या कामकाजात अधिक विश्वासार्हता आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नियुक्ती यापुढे केंद्र सरकारकडून थेट केली जाणार नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे. पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेली समिती या महत्त्वाच्या पदांवर नियुक्तीची शिफारस करेल. लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्त असल्यास सर्वात मोठ्या विरोधी पक्षाचा नेता या समितीचा सदस्य असेल. या समितीने निवडलेल्या व्यक्तीची अध्यक्षपदावर नियुक्ती करेल. जोपर्यंत संसदेकडून यासंदर्भात कायदा होत नाही तोपर्यंत ही व्यवस्था लागू राहील, असे न्यायालयाने म्हटले आहे.**



न्यायमूर्ती केएम जोसेफ यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने लोकशाहीवर लोकांचा विश्वास टिकवून ठेवणे आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. जेव्हा त्यांना निवडणूक आयोगाचे काम विश्वासार्ह वाटेल तेव्हाच हे होऊ शकतं. न्यायमूर्ती अजय रस्तोगी, अनिरुद्ध बोस, हृषिकेश राय आणि सीटी रविकुमार हे खंडपीठाचे उर्वरित ४ सदस्य होते. या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यानही सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारने निवडणूक आयुक्तांची नियुक्ती चुकीची असल्याचे म्हटले होते. अशा व्यक्तीने मुख्य निवडणूक आयुक्तपदावर बसावे, जो गरज पडल्यास पंतप्रधानांवर कारवाई करण्यास मागेपुढे पाहणार नाही, असे न्यायालयाने म्हटले होते.

२४ नोव्हेंबर रोजी घटनापीठाने या प्रकरणी दाखल ४ याचिकांवर निर्णय राखून ठेवला होता. या याचिका अनूप बरनवाल, अश्विनी उपाध्याय, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि जया ठाकूर यांच्या होत्या. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची पद्धत पारदर्शक असावी, निवडणूक आयोगाला आर्थिक स्वायत्तता मिळावी आणि मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची प्रक्रिया निवडणूक आयुक्तांनाही लागू व्हावी, अशी मागणी या याचिकांमध्ये करण्यात आली होती.

खंडपीठाचे सदस्य न्यायमूर्ती अजय रस्तोगी यांनी स्वतंत्रपणे वाचलेल्या निर्णयात खंडपीठाच्या सामायिक निर्णयाशी सहमत आहे. तसेच, भविष्यात निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांना लागू असलेली हीच पद्धत अवलंबली जावी, असेही त्यांनी नमूद केले.

सध्या सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणे संसदेत महाभियोग प्रस्ताव आणूनच मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवता येते, परंतु मुख्य निवडणूक आयुक्तांच्या शिफारशीनुसार सरकारकडून निवडणूक आयुक्तांना हटवता येते. न्यायमूर्ती रस्तोगी म्हणाले की, मुख्य निवडणूक आयुक्तांना जे संवैधानिक संरक्षण आहे तेच अन्य दोन निवडणूक आयुक्तांनाही मिळायला हवे.

निवडणूक आयोगाला आर्थिक स्वायत्तता देण्याची आणि निवडणूक आयोगासाठी स्वतंत्र सचिवालय स्थापन करण्याची मागणीही सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली. न्यायमूर्ती म्हणाले की, निवडणूक आयोगाचे कामकाज सत्तेत असलेल्या पक्षावर अवलंबून राहू शकत नाही. देशाच्या एकत्रित निधीतून निधीचे वाटप केले जावे जेणेकरुन ते आपले काम स्वायत्तपणे आणि स्वतंत्रपणे करू शकेल. मात्र, न्यायालयाने निवडणूक आयोगाला स्वतंत्र सचिवालय आणि आर्थिक स्वायत्तता देण्याबाबत कोणताही थेट आदेश दिलेला नाही. न्यायालयाने सरकार आणि संसदेला याबाबत कायदा करण्याची विनंती केली.

# आंदोलन केल्यास २० हजारांचा दंड

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**आता नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना २० हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. कोणत्याही प्रकारच्या हिंसाचारासाठी ३० हजारापर्यंत दंड होऊ शकतो किंवा तुमचा विद्यापीठातील प्रवेश देखील रद्द होण्याची शक्यता आहे. आंदोलनांना रोखण्यासाठी विद्यापीठाने नवीन मार्गदर्शक तत्वे तयार केली आहेत.**

रूल्स ऑफ डिसिप्लीन अँड प्रॉपर कंडक्ट ऑफ स्टूडंट्स या शिर्षकाखाली १० पानी पुस्तकात निषेध, फसवणूक यांसारख्या कृतींसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा देण्यात आल्या आहेत. यासोबतच विद्यापीठात कोणत्याही प्रकारची चौकशी आणि निवेदन नोंदवण्याची प्रक्रियाही स्पष्ट करण्यात आली आहे.

**महिन्याभरापूर्वीच नियम लागू झाले**

कागदपत्रानुसार जर विचार केला तर ३ फेब्रुवारीपासूनच हे नियम लागू करण्यात आले आहे. हे नियमित आणि अर्धवेळ अशा दोन्ही विद्यार्थ्यांना लागू होईल. खरं तर, बीबीसीच्या वादग्रस्त माहितीपटाच्या स्क्रीनिंगवरून विद्यापीठात निदर्शनांची सीरीज सुरू झाली होती. त्यांना रोखण्यासाठी विद्यापीठाने हे ठोस पाऊल उचलले.

# सत्तासंघर्षावर पुढील सुनावणी १६ मार्चला

✔ सुराज्य/मुंबई



आम्हाला वाटतं नाही ठाकरे गट न्यायालयात शिंदे गटाची मदत घेईल, अशी मिश्किल टिप्पणी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी गुरुवारी केली. ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल व मनू सिंघवी यांना शिंदे गटाच्या वकीलांची मदत मिळाली तर त्यांना आनंदच होईल. पण आम्हांला वाटतं नाही ते न्यायालयात शिंदे गटाच्या वकीलांची मदत घेतील, असे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी नमूद केले. यावरील पुढील सुनावणी १६ मार्चला होणार आहे.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाची सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरु आहे. गुरुवारी शिंदे गटाकडून ज्येष्ठ वकील निरज कौल यांचा युक्तिवाद पूर्ण झाला. त्यानंतर ज्येष्ठ वकील हरिश साळवे यांनी शिंदे गटाच्यावतीने बाजू मांडण्यास सुरुवात केली. सत्ताबदलाचा संपूर्ण तपशील ज्येष्ठ वकील साळवे यांनी न्यायालयासमोर मांडला. महाराष्ट्रात सत्ता बदल होत असताना गोष्टी एवढ्या वेगाने घडत होत्या की काय होणार याचा कोणालाच अंदाज नव्हता, असे ज्येष्ठ वकील साळवे यांनी न्यायालयाला सांगितले.

ज्येष्ठ वकील साळवे यांचा युक्तिवाद सुरु असताना सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी पुढील सुनावणीची तारीख निश्चित करण्यासंदर्भात वकीलांशी चर्चा केली. साळवे यांनी पुढच्या सुनावणीत पाच मिनिटे युक्तिवाद करावा. त्यानंतर शिंदे गटाकडून ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी युक्तिवाद करतील. त्यांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यावर सॉलिसिटर जनरल यांची बाजू आम्ही ऐकू. सॉलिसिटर जनरल यांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यावर मग आम्हाला सिब्बल यांना प्रत्युत्तर सादर करण्यासाठी पूर्ण वेळ द्यायचा आहे. त्यासाठी सिब्बल व सिंघवी यांना शिंदे गटाच्या वकीलांशी याबाबत बोलावे लागेल. पण आम्हाला वाटतं नाही ते शिंदे गटाच्या वकीलांची न्यायालयात मदत घेतली, अशी टिप्पणी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केली. त्यानंतर न्यायालयाने यावरील पुढील सुनावणी १६ मार्चला होणार असल्याचे स्पष्ट केले.

# महारेराकडून ४५ बिल्डर्सना पाठवल्या कारणे दाखवा नोटीस



✔ सुराज्य/मुंबई

स्थावर संपदा अधिनियम कलम ४(२)(ख) (व) अन्वये नोंदणीकृत गृहनिर्माण प्रकल्प व्यवस्थितपणे पूर्ण व्हावा यासाठी, एका नोंदणीक्रमांकाच्या प्रकल्पासाठी एकच बँक खाते असणे बंधनकारक आहे. असे असताना १७८१ प्रकल्पांनी त्यांची बँक खाती एकापेक्षा जास्त प्रकल्पांशी संलग्न केल्याची अनियमितता महारेराच्या झाडाझडतीत समोर आली आहे.

महारेराने या अनियमिततेची दखल घेतली असून आतापर्यंत अशा ४५ प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत. उर्वरित प्रकल्पांनांही कारणे दाखवा नोटीसा पाठविणे सुरू आहे.

भविष्यात असे प्रकार होऊ नये म्हणून एका प्रकल्पाचे पदनिर्देशित खाते दुसऱ्या प्रकल्पाच्या बँक खात्याशी जोडण्याचा प्रयत्न केल्यास त्याला अटकाव होईल आणि तसे करता येणार नाही, असे बदल संगणकीय प्रणालीत करण्यात आले आहेत. याशिवाय आता विकासकाने परस्पर खातेबदल करायचा प्रयत्न केल्यास तेही होणार नाही. आता महारेराने नवीन आदेश काढून या बदलासाठी महारेराची पूर्व परवानगी अत्यावश्यक केलेली आहे.

# रस्त्यावर उतरून नामांतराला विरोध

✔ सुराज्य/छ. संभाजीनगर

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांचे राजकीय दुकान चालावे म्हणून औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्याचा मुद्दा हाती घेतला.



३०- ३५ वर्षापासून त्यावर घाणरडे राजकारण सुरू आहे.

खरे प्रकरण न्यायालयात असताना केंद्र सरकारने घेतलेला निर्णय आम्ही सर्वोच्च न्यायालयापेक्षाही मोठे आहोत असे सांगणारा आहे त्यामुळे निर्णयामागे हुकुमशाही वृत्ती दिसते अशी टीका करत एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी आम्ही आमची नाराजी रस्त्यावरही व्यक्त करू, त्यासाठी कोणत्या प्रकारचे आंदोलन करायचे यावर शहरातील विविध व्यक्तींशी चर्चा करू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'वापरा आणि फेका हे भाजपाचं धोरण : उद्धव ठाकरे

✔ सुराज्य/मुंबई

कसबा पेठ निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार जिंकल्याचा मला आनंद आहे. एवढ्या मोठ्या प्रभावातून कसबा बाहेर पडत असेल तर देश बाहेर पडायला काही हरकत नाही असं म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. एका चांगल्या बदलाची सुरूवात आहे असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

भाजपाच्या विरोधातली मतांची संख्या वाढते आहे ही एकत्र करणं हे मोठं आव्हान आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. मतदार जागरूक होत चालले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीने एकत्र राहणं आणि कसोशीने प्रयत्न करणं आवश्यक आहे.



'वापरा आणि फेका हे भाजपाचं धोरण आहे'

वापरा आणि फेका हे भाजपाचं धोरण आहे हे मी बोललो होतो. तेच पुण्यात झालं. शिवसेनेचाही वापर करून फेकला. मुक्ता टिळक यांच्या घरातही तिकिट दिलं गेलं नाही त्यामुळे वापरा आणि फेका हेच समोर आलं. गिरीश बापट यांना ऑक्सिजनच्या नळ्या लावून प्रचाराला आणलं. सहानुभूती पाहिजे पण ती पण सिलेक्टिव्ह हवी हे मतदार कधी स्वीकारत नाही असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# भाजपच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसचा विजय

रवींद्र धंगेकर यांचा ऐतिहासिक विजय

✔ सुराज्य/पुणे

**गेल्या अनेक महिन्यापासून चर्चेच असलेल्या कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीचा जाहीर होणार आहे. या निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात झाली आहे. नुकताच कसबा पोटनिवडणूकीचा निकाल हाती आला असून भाजपच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसने मोठा धक्का दिलाय. कसब्यात महाविकास आघाडी उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा विजय झालेला आहे. भाजपच्या हेमंत रासने यांचा पराभव झालेला आहे.**



कसब्यात मतमोजणीच्या अगदी सुरूवातीपासूनच महाविकास आघाडीचे रवींद्र धंगेकर आघाडीवर राहिले. केवळ एखाद-दुसऱ्या फेरीचा अपवाद वगळता हेमंत रासने यांना एकदाही रवींद्र धंगेकर यांच्याविरुद्ध निर्णायक आघाडी घेता आली नाही.

विशेष म्हणजे सदाशिव पेठ, नारायण पेठ, शनिवार पेठ या पेठांमधून काँग्रेसचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांना जास्त मते मिळाली. कसब्यातून आलेला निकाल हा अनपेक्षित असल्याची भावना व्यक्त करण्यात येतेय. हा एक ऐतिहासिक विजय असल्याची भावना कसबाकरांची आहे. धंगेकर यांनी ११ हजार ४० मतांनी भाजपचे उमेदवार हेमंत रासने यांचा पराभव केला आहे.सदाशिव पेठ, नारायण पेठ, आणि शनिवार पेठेतून भाजपच्या हेमंत रासनेंना आघाडी मिळाली, मात्र याची रवींद्र धंगेकरांना पराभूत करण्यासाठी मदत झालेली नाही. तसंच कसबा पेठ, सोमवार पेठ, मंगळवार पेठमध्येही रासनेंना मतं मिळाली. पण ती सुद्धा रवींद्र धंगेकर यांना टक्कर देऊ शकली नाहीत.

# सावंतांच्या इलाख्यात संभाजीराजेंकडून आरोग्य यंत्रणेची झाडाझडती

रुग्णालयांची दुरावस्था पाहून संतापले

✔ सुराज्य/धाराशिव

**राज्याच्या आरोग्यमंत्रीपदाचा कारभार स्वीकारल्यापासून तानाजी सावंत हे कायमच वादग्रस्त मुद्द्यांमुळे चर्चेत राहिले आहेत. मध्यंतरी त्यांनी एकापाठोपाठ एक वादग्रस्त वक्तव्यांची मालिका लावली होती. यानंतर वरिष्ठांकडून योग्य ती समज देण्यात आल्यानंतर तानाजी सावंत हे 'आपण बरे आणि आपले काम बरे' या उक्तीनुसार वागताना दिसत आहेत. त्यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देण्याचे प्रमाणही कमी केले आहे. यानंतरच्या काळात कोणताही वाद न ओढावून घेतल्यामुळे तानाजी सावंत यांच्या आरोग्य खात्याचा कारभार आलबेल सुरु असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, आता संभाजीराजे छत्रपती यांनी तानाजी सावंत यांच्या मतदारसंघातील आरोग्य यंत्रणेची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. खुद्द आरोग्यमंत्र्यांच्याच मतदारसंघात आरोग्य सुविधेची वानवा आणि रुग्णालयांची दुरावस्था झाल्याचा आरोप संभाजीराजे यांनी केला आहे. त्यामुळे तानाजी सावंत कोंडीत सापडण्याची शक्यता आहे.**



संभाजीराजे छत्रपती यांनी सध्या त्यांच्या स्वराज्य संघटनेच्या विस्तारासाठी धाराशिवच्या दौऱ्यावर आहेत.

संभाजीराजे यांनी मंगळवारी तानाजी सावंत यांच्या मतदारसंघात येणाऱ्या भूम शहरातील शासकीय रुग्णालयाला भेट दिली.

यावेळी संभाजीराजे यांनी रुग्णालयाची दुरावस्था पाहून आरोग्य विभागाचे वाभाडे काढले. भूम शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि नर्सची कमतरता आहे. रुग्णालय अस्वच्छ असून अनेक वैद्यकीय उपकरणे बंद पडल्याचे पाहून संभाजीराजे छत्रपती चांगलेच संतापले. याशिवाय, भूम येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्थाही फारशी चांगली नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

या पाहणीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना संभाजीराजे छत्रपती यांनी आरोग्य विभागाला चांगलेच फैलावर घेतले. आम्ही काहीही सहन करु. पण आरोग्य विभाग आणि प्राथमिक केंद्राची दुरावस्था सहन करणार नाही. मी यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आरोग्याचे विषय गांभीर्याने घ्या, अन्यथा मी बघून घेईन, असा इशाराही त्यांनी आरोग्य खात्याला दिला.

# चिंचवड पोटनिवडणुकीमध्ये अश्विनी जगताप विजयी

✔ सुराज्य/पुणे

पुण्यात कसबा पेठ आणि चिंचवड पोटनिवडणुकीचा आज निकाल लागला. यामध्ये निवडणुकीत कसबा पेठमधून काँग्रेसचे उमेदवार रविंद्र धंगेकर तर पिंपरी चिंचवडमधून अश्विनी जगताप यांचा विजय झाला आहे. दरम्यान मतमोजणी पार पडल्यानंतर पिंपरी चिंचवडमध्ये अश्विनी जगताप यांना १ लाख ३५ हजार ४३४ मते मिळाली तर नाना काटे यांना ९९ हजार ३४३ मते मिळाली आहेत. ३%व्या फेरीनंतर ३६,०९१ मतांनी जगताप विजयी झाल्याचे घोषीत करण्यात आले.

चिंचवडमध्ये महाविकास आघाडीला बंडखोरीचा फटका बसल्याचे दिसून येत आहे. राहुल कलाटे यांनी तब्बल ४४ हजारांपेक्षा जास्त मतं मिळवल्याने याच मतांचा फटका महाविकास आघाडीच्या उमेदवाराला झाल्याचे दिसून येत आहे. या



दोन्ही जागांसाठी रविवार २६ फेब्रुवारीला मतदान झालं होतं. भाजप आमदार मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे ही पोटनिवडणूक झाली. कसब्यामधून भाजपचे हेमंत रासने यांचा सामना काँग्रेसच्या रवींद्र धंगेकर यांच्याशी होता. तर चिंचवडमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळाली. चिंचवडमध्ये भाजपने लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना तर राष्ट्रवादीने नाना काटे यांना रिंगणात उतरवलं. अपक्ष म्हणून राहुल कलाटेही रिंगणात उतरले होते.

